सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. २२ मार्च २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३४२ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## आयपीएलला दुखापतीचा विळखा

**मुंबई :** आयपीएल २०२६ सुरू होण्यास केवळ एक आठवडा शिल्लक असतानाच, अनेक संघ दुखापतींशी झुंजत आहेत. १० पैकी आठ फ्रँचायझींना याचा फटका बसला आहे. दुखापतग्रस्त झालेले जवळपास सर्व क्रिकेटपटू गोलंदाज आहेत. सनरायझर्स हैदराबाद आणि लखनऊ सुपर जायंट्स या संघांना दुखापतींचा सर्वाधिक फटका बसण्याची शक्यता आहे. आयपीएल २०२६ च्या संघांबाबत आतापर्यंत उपलब्ध झालेल्या माहितीनुसार, १५ क्रिकेटपटू विविध प्रकारच्या दुखापतींनी त्रस्त आहेत. काही क्रिकेटपटू संपूर्ण हंगामासाठी संघाबाहेर आहेत, तर काही सुरुवातीचे सामने खेळू शकणार नाहीत.

## मेट्रोचे तिकीट आता उबेरवर

**मुंबई :** मुंबई मेट्रोने प्रवाशांसाठी डिजिटल सुविधांमध्ये आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. आता मेट्रोचे तिकीट थेट णलशी पच्या माध्यमातून बुक करता येणार असून या सेवेमुळे मुंबईकरांचा प्रवास अधिक सोपा आणि वेगात होणार आहे. या आधी मेट्रो प्रवासी तिकीट बुकिंगसाठी यात्री, नवी, ईएमटी, टॅम्पॉक यासारख्या अपवर तिकीट बुकिंग सेवा उपलब्ध होत्या या नव्या सुविधेत जछऊ प्लॅटफॉर्मचे इंटिग्रेशन करण्यात आले असून आता णलशी चीही भर होणार आहे. त्याद्वारे उबर वापरणाऱ्या प्रवाशांना मेट्रो तिकीट सहज उपलब्ध होणार आहे. शिवाय तिकिटांवर काही प्रमाणात सवलतीही मिळणार आहेत.

## सिंघानीयांची बोट उलटली

**मुंबई :** उद्योग क्षेत्रातील प्रमुख नाव असलेले रेमंड ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक गौतम सिंघानिया हे मालदीवमध्ये झालेल्या बोट अपघातात जखमी झाले आहेत. गुरुवारी रात्री उशिरा फेलिधू परिसरात त्यांची स्पीडबोट समुद्रात उलटल्याची घटना घडली. या अपघातानंतर त्यांना तातडीने एअरलिफ्ट करून मुंबईत आणण्यात आले असून सध्या एका खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# भारत चीन संबंध अधिक दृढ होणार

## बीजिंग आणि दिल्ली दरम्यानची थेट विमानसेवा पुन्हा सुरू

नवी दिल्ली : भारत आणि चीन दरम्यानची हवाई वाहतूक आता पूर्ववत होत आहे. नवी दिल्ली आणि चीनची राजधानी बीजिंग दरम्यानची विमानसेवा लवकरच पुन्हा सुरू होणार आहे. भारतातील चिनी दूतावासाच्या प्रवक्त्या यू जिंग यांनी पुष्टी केली आहे की, ही विमाने थेट असतील. प्रवक्त्यांच्या म्हणण्यानुसार, एअर चायना ही विमानसेवा चालवणार आहे.

चिनी दूतावासाच्या प्रवक्त्यांनी याचे वर्णन केवळ प्रवासच नव्हे, तर व्यापार, पर्यटन आणि विश्र्वास पुनर्संचयित करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल असे केले आहे. त्यांनी याला एससीओ आणि ब्रिक्स देशांमधील लोकांमधील संपर्क वाढवण्यासाठी मिळालेला हिरवा कंदील म्हटले आहे. गेल्याच महिन्यात, शांघाय आणि दिल्ली, चीन दरम्यानची थेट विमानसेवा पुन्हा सुरू झाली होती.

भारत आणि चीनमधील या शहरांदरम्यान सहा वर्षांतील ही पहिली थेट विमानसेवा होती. एअर इंडियाचे पहिले विमान नवी दिल्लीहून शांघायच्या पुडोंग आंतरराष्ट्रीय विमानतळावर दाखल झाले, ज्यात २३० प्रवासी होते.

यापूर्वी २०२० मध्ये सीमेवर झालेल्या लष्करी संघर्षानंतर भारत आणि चीन दरम्यानची विमानसेवा थांबवण्यात आली होती. अलीकडेच संबंधांमध्ये झालेली सुधारणा विमानसेवा पुन्हा सुरू झाल्याने स्पष्ट झाली आहे. भारत आणि चीनमधील विविध शहरांदरम्यानची विमानसेवा गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये सुरू झाली. इंडिगो गेल्या वर्षी नोव्हेंबरपासून कोलकाता आणि ग्वांगझू तसेच दिल्ली आणि ग्वांगझू दरम्यान विमानसेवा चालवत आहे. चीनची विमान कंपनी, चायना ईस्टर्ननेही नोव्हेंबरमध्ये शांघाय आणि दिल्ली दरम्यान विमानसेवा सुरू केली आहे.




# भारताने होर्मुजच्या सामुद्रधुनीला शोधला सुरक्षित पर्याय

नवी दिल्ली : पश्चिम आशियात अमेरिका आणि इस्त्रायल विरुद्ध इराण असे युद्ध २८ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू आहे. इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या जलवाहतुकीवर फास आवळला आहे. कोणत्या देशाचे जहाज होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जावे यावर इराणचे कठोर नियंत्रण आहे. इराणचे हे नियंत्रण अद्याप तसूभरही कमी झालेले नाही. इराणच्या या सामर्थ्यावर हल्ला करण्याचे अमेरिका आणि इस्त्रायलचे प्रयत्न अद्याप अपेक्षित यश मिळवू शकलेले नाही.

युद्धामुळे भारताला होर्मुझमार्गे होणाऱ्या इंधनाच्या पुरवठ्याला धोका निर्माण झाला होता. पण भारत आणि इराण यांच्यात फोनवरून चर्चा झाली. यानंतर इराणने भारताला तेल आणि गॅसचा पुरवठा करणाऱ्या जहाजांना होर्मुझमधून जाण्याची परवानगी दिली. सध्या या परवानगीमुळे होर्मुझमधून भारताला होणाऱ्या तेल आणि गॅसच्या पुरवठ्याला कोणतीही अडचण



नाही. पण भविष्यात युद्धमुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे होर्मुझमधील परिस्थिती बिघडली तर भारताचे ऊर्जोस्रोत संकटात सापडू नये यासाठी भारताने होर्मुजच्या सामुद्रधुनीला पर्याय असा सुरक्षित सागरी मार्ग शोधला असल्याचे वृत्त रॉयटर्स या वृत्तसंस्थेने दिले आहे.

भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्या पश्र्चिम आफ्रिका आणि आशिया–पॅसिफिकमधील तेलाकडे वळत आहेत. भारताची सरकारी कंपनी हिंदुस्तान पेट्रोलियमने एका निविदेद्वारे अंगोलाकडून २० लाख बॅरल तेल खरेदी केले आहे. भारत आधी तेल आणि गॅससाठी आखाती देशांवर ४५ टक्के अवलंबून होता. पण पर्याय सापडल्यामुळे आता भारताचे होर्मुझवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होणार आहे.

रॉयटर्सच्या वृत्तानुसार एचपीसीएलने एक्सॉनकडून दहा लाक बॅरल तेलाची खरेदी केली आहे. तसेच इंडियन ऑइल ही कंपनी पश्र्चिम आफ्रिकेतून तेलाची खरेदी करण्यासाठी काही प्रतिनिधींशी चर्चा करत आहे. यामुळे मे महिन्यापासून भारताचे होर्मुझवरील अवलंबित्व लक्षणीयरित्या कमी होणार आहे.

## भाजपाची तिसरी यादी जाहीर

तिरुअनंतपुरम : भाजपने २०२६ च्या केरळ विधानसभा निवडणुकीसाठी आपल्या उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली आहे. या यादीत ११ उमेदवारांच्या नावांचा समावेश आहे. केंद्रीय निवडणूक समितीने या नावांना अंतिम मंजुरी दिली आहे. या यादीनुसार, पेरुमाडे मतदारसंघासाठी व्ही. रतीश आणि पुथुप्पल्लीसाठी रवींद्रनाथ वक्कट्थानम यांना उमेदवारी देण्यात आली आहे. भाजपने आपल्या तिसऱ्या यादीत प्रामुख्याने दक्षिणेकडील जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. पक्षाने तिरुवनंतपुरम, कोवलम, पुथुपल्ली आणि चावरा यांसारख्या जागांवर उमेदवार उभे केले आहेत. पक्षाने अनुसूचित जाती (डउ) जागांसाठीही उमेदवारांची घोषणा केली असून, यातून सामाजिक संतुलन राखण्याचे पक्षाचे प्रयत्न स्पष्टपणे दिसून येतात.



# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## कॉर्पोरेटमध्ये समाजकार्य विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च :** महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभागातर्फे बीएसडब्ल्यू तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून कनेक्ट फॉर (रोझी ब्ल्यु फाऊंडेशन), मुंबईचे सामाजिक कार्यकर्ते गणेश चव्हाण उपस्थित होते.

यावेळी बोलताना चव्हाण म्हणाले की, १९६० मध्ये टाटा समाज विज्ञान संस्थेद्वारे भारतात व्यावसायिक समाजकार्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. आज कॉर्पोरेट सेक्टरमध्ये समाजकार्य विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या सुवर्णसंधी उपलब्ध आहेत, त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. त्यांनी विद्यार्थ्यांना एमएसडब्ल्यू प्रवेश प्रक्रिया, गट चर्चा, फील्ड वर्क आणि प्रभावी सादरीकरण याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच इंग्रजी संभाषणाची भीती न बाळगता कौशल्य विकासावर भर देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षपद प्रभारी प्राचार्य प्रो.डॉ.आनंद शेवाळे यांनी भूषवले. यावेळी अझीम प्रेमजी युनिव्हर्सिटी, बेंगलोर येथे निवड झाल्याबद्दल अजय राऊत व गौरी रसाळ या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास विभागप्रमुख प्रो.डॉ.दिनेश मौने, डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, प्रा.काशिनाथ पवार व प्रा.आशिष स्वामी उपस्थित होते.कौशल्य विकासावर स्पर्धात्मक युगात भर द्या केवळ पदवी मिळवणे पुरेसे नसून, विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्त्व विकास आणि सादरीकरण शैलीवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. गणेश चव्हाण यांनी आपल्या मार्गदर्शनात मुलाखत तंत्र, अहवाल लेखन आणि फील्ड वर्कचे महत्त्व अधोरेखित केले.



# लातुरात रमजान ईद उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च :** लातूर शहर व जिल्हाभरात शनिवारी रमजान ईद उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. मुस्लिम बांधवांनी परस्परांना ईदच्या शुभेच्छांची देवाण - घेवाण केली. तसेच समाजातील अन्य समाज घटकांमधील आपल्या इष्ट मित्र - आप्तेष्टांसह शिरखुर्म्याचा आस्वादही घेतला.

रमजान ईद हा मुस्लिम समाज बांधवांचा अतिशय महत्वाचा सण असतो. रमजानच्या एक महिन्याच्या उपवासानंतर मुस्लिम शव्वाल महिन्याच्या पहिल्या दिवशी हा सण साजरा केला जातो. तत्पूर्वी ईदच्या आदल्या दिवशी चंद्रदर्शन झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी ईद साजरी करण्यात येत असल्याची घोषणा शाही इमामांकडून केली जाते.



खऱ्या अर्थाने हा राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडवणारा उत्सव मानला जातो. हिंदू बांधवांची दिवाळी आणि मुस्लिम बांधवांची रमजान ईद हे दोन्ही उत्सव राष्ट्रीय एकात्मता जोपासण्याकामी महत्वाची भूमिका बजावण्याचे काम करतात. ईदच्या अनुषंगाने शहरातील दयानंद महाविद्यालया समोरील ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज अदा करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. ईदच्या निमित्ताने हजारोंच्या संख्येने मुस्लिम बांधव नमाज पठणासाठी एकत्रित येत असल्याने होणारी गर्दी लक्षात घेता प्रशासनाने अगोदरच वाहतूक व्यवस्थेत बदल केले होते. शहराच्या मुख्य रस्त्यावरील वाहतूक अन्य मार्गावरून वळविण्यात आली होती. प्रशासनाने केलेल्या या पूर्वतयारीमुळे मुख्य रस्त्यावर होणारी वाहतुकीची कोंडी टाळणे शक्य होऊ शकले.

लातूर शहरात रमजान ईदच्या पार्श्र्वभूमीवर नेहमी गर्दीने, हातगाड्यांनी गजबजलेली गंज गोलाई बऱ्यापैकी शांत होती. ईद मुळे मुस्लिम बांधवानी घेतलेल्या सुटीचाही तो परिणाम असल्याचे निदर्शनास आले. अन्यथा अतिक्रमणाच्या विळख्यात नेहमीच गंज गोलाई हरवून गेलेली पाहावयास मिळते. प्रशासनाने गंज गोलाईची सौंदर्य अबाधित ठेवून हातगाड्यांवर व्यवसाय करणाऱ्या सर्व बांधवांना स्वतंत्र जागा उपलब्ध करून दिल्यास कधीही गंज गोलाई अतिक्रमणाच्या विळख्यात भावना अनेकांनी व्यक्त केल्याचे ऐकायला मिळाले. रमजान ईदच्या पार्श्र्वभूमीवर लातूर शहरात आठवडाभरापासून कपडे, बूट, चप्पल यासह दैनंदिन उपयोगाच्या वस्तू स्वस्त दरात उपलब्ध करून दिल्या जात होत्या. त्याच्या खरेदीसाठी मुस्लिम तसेच समाजातील अन्य समाज बांधवही या खरेदीसाठी मोठी गर्दी करताना दिसून आले. रमजान ईदचा उत्साह मुस्लिम समाजबांधवांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहताना पाहायला मिळाला. एकंदर सर्वांना सोबत घेऊन त्यांनी ईद साजरी केली.

## पोलिस शेतकऱ्यांच्या बांधावर या उपक्रमांतर्गत शिरूर अनंतपाळ येथे प्रलंबित वादाचा निपटारा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च :** लातूर जिल्हा पोलीस दलाकडून पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या पोलिस शेतकऱ्यांच्या बांधावर या उपक्रमांतर्गत शिरूर अनंतपाळ पोलीस ठाणे हद्दीत एक महत्त्वपूर्ण व संवेदनशील शेत रस्त्याचा वाद सामोपचाराने मिटवण्यात येऊन सामाजिक ऐक्य व जातीय सलोख्याचा आदर्श निर्माण करण्यात आला आहे.

शिरूर अनंतपाळ येथील शेतकरी शेरखान अब्बास तांबोळी व त्यांचे शेतशेजारी धनराज वैजनाथ ओलांडे यांच्यात मागील काही दिवसांपासून शेत रस्त्याच्या कारणावरून वाद होता. हा वाद वाढण्याची व स्थानिक पातळीवर तणाव निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भंडे, संबंधित बिट अंमलदार व तलाठी पाटील यांनी तात्काळ पुढाकार घेत प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन दोन्ही पक्षांशी संवाद साधला. पोलीस व महसूल प्रशासनाने संयम, समजूतदारपणा व कायदेशीर मार्गदर्शनाच्या माध्यमातून दोन्ही शेतकऱ्यांना एकत्र बसवून त्यांचे म्हणणे शांततेत ऐकून घेतले व परस्पर समन्वयातून तोडगा काढण्यात यश मिळवले. यामुळे दीर्घकाळापासून प्रलंबित असलेला वाद कोणताही तणाव निर्माण न होता आपसांत मिटवण्यात आला.

विशेष म्हणजे, या वादाचा निपटारा हा रमजान ईद या पवित्र सणाच्या पूर्वसंध्येला झाल्यामुळे या प्रसंगाला अधिक भावनिक व सामाजिक महत्त्व प्राप्त झाले. दोन्ही शेतकरी मित्रांनी सर्व मतभेद बाजूला ठेवत एकमेकांना गळाभेट दिली व बंधुभावाचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले. यावेळी शेरखान अब्बास तांबोळी यांनी सर्व उपस्थितांना शिरखुर्मा साठी निमंत्रित करून सणाचा आनंद एकत्र साजरा केला. या घटनेतून विविधतेत एकता आणि जातीय सलोखा यांचा प्रेरणादायी संदेश समाजाला मिळाला.

## २५ मार्च रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, २५ मार्च, २०२६ रोजी सकाळी १० वाजता शिक्षण महर्षी वसंतराव काळे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (शासकीय आय.टी.आय), औसा रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, लातूर येथे पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यात पुणे येथील स्वेस कॉर्प लिमिटेड, छत्रपती संभाजीनगर येथील पिप्ती इंजिनिअरींग प्रा. लि., पुणे येथील प्रॉम्प्ट इंडस्ट्रिअल सर्व्हिसेस प्रा.लि., सोलापूर येथील कोलब्रो ग्रुप प्रा. लि., लातूर येथील सनरिच क्वा , चैतन्य इंडिया फिन क्रेडिट प्रा. लि., श्रीराम फायनान्स लिमिटेड, माहिष्मती सेक्युरिटी सर्व्हिसेस प्रा. लि., क्रेडीट क्सेस ग्रामीण लि., फ्यिुजन फायनान्स लिमिटेड या आस्थापना सहभागी होणार आहेत. या आस्थापनेमध्ये दहावी, बारावी, कोणतीही पदवी, पदव्युत्तर पदवी, आय.टी.आय. सर्व ट्रेड, डिप्लोमा सर्व ट्रेड तसेच इतर शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांना सहभागी होणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी बुधवार, २५ मार्च, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता शिक्षण महर्षी वसंतराव काळे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (शासकीय आय.टी.आय), औसा रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, लातूर येथे स्वखर्चाने मुलाखती करीता आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे, स्वत:चा रिझ्युम, बायोडाटा, पासपोर्ट फोटो इ. (तीन प्रती) सह उपस्थित रहावे, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, लातूर यांनी केले आहे.

## सांदिपनी इंजिनिअरिंग, पॉलिटेक्निकमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च :** लातूर शहरापासून जवळच असलेल्या कोळपा येथील सांदिपनी टेक्निकल कॅम्पस फॅकल्टी ऑफ इंजिनिअरिंग अँड पॉलिटेक्निक महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा युगांतर २०२६ दयानंद सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



या स्नेहसंमेलन सोहळ्याचे उदघाटन मराठी सिने अभिनेत्री सिमरन खेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष विनोद अग्रवाल, उपाध्यक्ष डॉ. अनिल राठी , विजय हिबारे, इंजिनिअरिंग कॉलेजच्या प्राचार्या डॉ. संजीवनी कुलकर्णी, पॉलिटेक्निकच्या प्राचार्या वाकडे शितल, प्रबंधक बडगीरे उध्दव आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या सर्व विद्या शाखांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर शैक्षणिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी करणारे प्रा. डॉ. आशिष अग्रवाल, चोपने अजय व रुपाली शिंदे यांचा संस्थेच्या वतीने गौरव करण्यात आला. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. अनिल राठी यांनी महाविद्यालयातील सर्व गुणवंत विद्यार्थी व प्राध्यापक वृंदांचे कौतुक केले. अल्पावधीतच महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात निर्माण केलेली ओळख पाहून समाधान व्यक्त करून त्यांनी भविष्यात सांदिपनी महाविद्यालय शिक्षण क्षेत्रात यापेक्षाही अधिक भरारी घेईल असा विश्र्वास व्यक्त केला.

आपल्या उदघाटनपर मनोगतात अभिनेत्री सिमरन खेडकर यांनी आपण स्वतः लातूरची कन्या असल्याने या सोहळ्यास आवर्जून उपस्थित राहण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. इंजिनिअरिंग, पॉलिटेक्निक अशा विविधतेने नटलेले हे प्रगतीपथावरील महाविद्यालय पाहून आपल्याला अतिशय आनंद झाल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंजिनिअरिंगच्या प्राचार्या डॉ. संजीवनी कुलकर्णी यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी संस्थेच्या प्रगतीविषयी सविस्तर माहिती दिली. आपल्या संस्थेच्या १५ वर्षाच्या कार्यकाळात झालेल्या शैक्षणिक प्रगतीबद्दल संस्थेचे कार्यकारी मंडळ तसेच पालकवर्गही समाधान व्यक्त करतात हे पाहून सर्व स्टाफही अधिक कार्यक्षमतेने काम करत असल्याचे त्या म्हणाल्या. वर्ष २०२४ - २५ मध्ये संस्थेमध्ये शिक्षण घेतलेल्या एकूण ९५ टक्के विद्यार्थ्यांची कॅम्पसमध्ये निवड झाली असून यावर्षीही ८० टक्क्यांहून अधिक विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. अजूनही यावर्षी कॅम्पसमध्ये निवड होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ अपेक्षित आहे. पालकांनी आपल्या पाल्यांच्या भवितव्याबद्दल कोणतीही चिंता करू नये, असेही त्यांनी आश्र्वस्त केले.

कार्यक्रमास स्नेहसंमेलन प्रमुख प्रा. बी.एम. सातपूते , प्रा. व्ही.एम. गीर, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. एम.डी. लोमटे,प्रा. पी.जे. गरड यांसह सर्व विभाग प्रमुख , प्राध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधी अमन गुट्टे, अभय पिंपळे , चिन्मय गायकवाड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनाली कुलकर्णी, प्रा.वेदपाठक यांनी आभार प्रदर्शन प्रा. सातपूते यांनी केले.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात स्वयंशासन दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च :** दयानंद वाणिज्य महाविद्यालयात स्वयंशासन दिन मोठ्या उत्साहात आणि अभिनव पद्धतीने साजरा करण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका निभावत विविध विषयांच्या तासिका घेतल्या, तर प्राचार्य आणि प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या भूमिकेत सहभागी झाल्याने महाविद्यालयात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले. दरम्यान, या दिनाला आणखीन रोमांचक बनविण्यासाठी स्वयंशासन दिनाचे प्राचार्य यांच्याकडे विद्यार्थी आणि प्राध्यापक यांनी मोर्चा काढत गमतीशीर मागण्या मांडल्या.

स्वयंशासन दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अध्यापनाचा अनुभव मिळाला. वर्गात उभे राहून विषय मांडताना विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, सादरीकरण कौशल्य आणि जबाबदारीची जाणीव दाखवून दिली. प्राध्यापकांनीही विद्यार्थ्यांच्या या प्रयत्नांचे कौतुक करत त्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य तथा ‘उत्कर्ष २०२६’ या वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रभारी डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासकीय अधिकारी प्रा. ऋतुजा देशमुख, तसेच समन्वयक डॉ. सुभाष मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.

उत्कर्ष २०२६ चा जल्लोष...

सध्या महाविद्यालयात ‘उत्कर्ष २०२६’ या वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले असून, त्यानिमित्ताने विविध शैक्षणिक स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपक्रम राबविण्यात येत आहेत. या सर्व उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, महाविद्यालयीन परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. स्वयंशासन दिनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संवादकौशल्य आणि संघभावना विकसित करण्याचा प्रयत्न होत असल्याचे महाविद्यालय प्रशासनाने सांगितले. २३ मार्चला स्नेहसंमेलनाचे उदघाटन होणार आहे तर २५ तारखेला समारोप होईल.

### माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित

# पोद्दार हॉस्पिटलच्या मोफत अस्थिरोगशिबिरात ७८ रुग्णांची तपासणी – उपचार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च :** प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या जन्मदिनानिमित्त येथील ख्यातनाम अस्थिशल्य चिकित्सक डॉ. अशोक पोद्दार यांच्या पोद्दार हॉस्पिटलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या मोफत अस्थिरोग शिबिरात ७८ रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले. पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने आयोजित करण्यात आलेले हे १६९ वे मोफत आरोग्य शिबीर होते.या शिबिराच्या उदघाटनप्रसंगीलातूर शहर मनपाचेविद्यमान उपमहापौर एड. स्नेहल उटगे, माजी उपमहापौर कैलास कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी लातूर आयएमएचे अध्यक्ष डॉ . अभय कदम, डॉ. संजय शिवपूजे , डॉ. शशी पाटील, डॉ. मंगेश कुलकर्णी, डॉ. अभय कुलकर्णी, डॉ. पल्लवी जाधव, प्रसाद उदगीरकर, जयेश बजाज, श्यश्याम धूत, रामेश्र्वर सोमाणी, विजय पस्तापुरे , बालाप्रसाद सारडा, विजय रांदड आदी मान्यवर उपस्थित होते. दीपप्रज्वलन व धन्वंतरी पूजनानेशिबिराचे उदघाटन करण्यात आले. पोद्दार हॉस्पिटलच्या प्रमुख पाहुण्यांचा हृद्यसत्कार करण्यात आला. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना एड. स्नेहल उटगे यांनी माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या जन्मदिनानिमित्त प्रतिवर्षी अशा प्रकारच्या मोफत शिबिराचे आयोजन केले जाते, ही बाब अतिशय महत्वाची आहे. समाजातील सर्वचस्तरातील रुग्णांना या शिबिराचा चांगलाच फायदा होतो. आ. अमित देशमुख यांचे नेतृत्व सर्वव्यापी असल्याने त्यांच्याप्रती अशा पद्धतीने स्नेह व्यक्त करणारी मंडळीही मोठ्या संख्येने लातुरात आहे, ही बाब खरोखर गौरवास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.






माजीउपमहापौर कैलास कांबळे यांनी आपल्या मनोगतात डॉ. अशोक पोद्दार प्रतिवर्षी आ. अमित देशमुख यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून मोफत शिबिराचे आयोजन करतात, ही बाब आता लातूरच्या सामान्य रुग्णांनाही माहिती झाली आहे. त्यामुळे अनेक रुग्ण या शिबिराची आतुरतेने प्रतीक्षा करताना दिसतात. लातुरात वैद्यकीय क्षेत्रात मोफत आरोग्य शिबिराचा पॅटर्न आणण्याचे काम डॉ. अशोक पोद्दार यांनी केले असून वैद्यकीय क्षेत्रातील कार्याबरोबरच ते सामाजिक कार्यातहीअग्रेसर असल्याचीभावना कांबळे यांनी व्यक्त केली. सामाजिक कार्यकर्ते प्रसाद उदगीरकर यांनी आपल्या मनोगतात डॉ. पोद्दार यांच्या आरोग्यविषयक कार्याचा गौरव करून समाजसेवेच्या ध्यासाने झपाटलेले वैद्यकीय क्षेत्रातील अग्रगण्य चेहरा म्हणजे डॉ. अशोक पोद्दार असल्याचे सांगितले. जयेश बजाज यांनी यावेळी बोलताना डॉ. अशोक पोद्दार यांना अशा प्रकारच्या मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करून रुग्णांना मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचा जणू छंदच जडला असल्याचे बोलून दाखवले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अशोक पोद्दार यांनी केले. ज्या समाजाने आपल्याला एवढे काही भरभरून दिले आहे, त्या समाजाचे आपणही काही देणे लागतो या भावनेने आपण मोफत आरोग्य शिबीराच्या आयोजनास प्राधान्य देत असल्याचेसांगितले. आ. अमित देशमुख यांच्या जन्मदिवसानिमित्त २००९ पासून सातत्याने असे मोफत शिबीर आयोजित केले जाते. आज वैद्यकीय सेवा सुविधा खूप महागल्या आहेत. सामान्य रुग्णांना चांगल्यातचांगल्या सेवा सुविधा मोफत तसेच माफक शुल्कात उपलब्ध करून देण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. समाजाच्या सर्वचस्तरातील रुग्ण त्याचा पुरेपूर लाभ घेतात, हेच या शिबिराचे सर्वात मोठे यश असल्याचे त्यांनी बोलून दाखवले. १९९९ पासून हॉस्पिटलच्या आईने उन्हाळ्यात नागरिकांना पिण्याच्या थंड पाण्याची सोय करण्यासाठी पाणपोई चालवली जाते. या पाणपोईत थंड पाण्याचे जार उपलब्ध करून दिले जातात. दिवसभरात हजारो नागरिक या पाणपोईचा लाभ घेतात असेही त्यांनी सांगितले. डॉ. अशोक पोद्दार महाराष्ट्र अस्थिरोग तज्ज्ञ संघटनेचे पदाधिकारी असून लातूर जिल्हा अस्थिरोग तज्ज्ञ संघटना, आयएमएम महाराष्ट्र, आयएमए लातूर, आशादीप , दिशा फाउंडेशन , रोटरी परिवार अशा विविध संघटनांच्या माध्यमातून कायम रुग्णसेवा आणि समाज कार्यात अग्रेसर असतात.आजच्या शिबिरात एकूण ७८ रुग्णांची तपासणी करण्यात आली. यामध्ये २७ रुग्णांचे एक्सरे ५० टक्के सवलतीच्या दरात काढण्यात आले. रक्त व लघवी तपासणीही५० टक्के सवलतीच्या दरात करण्यात आली. सर्वच्या सर्व ७८ रुग्णांची हाडांच्या ठिसूळतेची मोफत तपासणी करण्यात आली. गरजू रुग्णांना मोफत फिजिओथेरपीची सुविधा ही देण्यात आली. शिबिराच्या यशस्वीतेसाठी हॉस्पिटलचेव्यवस्थापक वसीमशेख यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. शिबिरातील रुग्णांना मोफत औषधीहीउपलब्ध करून देण्यात आली.

## शैक्षणिक कागदपत्रे हरवली आहेत

कळंब ते लातूर बस प्रवासादरम्यान अनमोल दिनकर यशवंते या नावाची यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची बी.ए. पासची डिग्री प्रमाणपत्र तसेच बी.ए. च्या तिन्ही वर्षाच्या गुणपत्रिका अशी शैक्षणिक कागदपत्रे तसेच पॅन कार्डसह इतरही कागदपत्रे असलेली फाईल हरवली आहे. कोणाला सापडल्यास कृपया खालील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा. योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

**: संपर्क :**
**अनमोल दिनकर यशवंते–**
**मोबाईल नंबर : ९०२१५ ३९८२१**

## संक्षिप्त वृत्त...

### ज्ञानोबा तुकाराम च्या जयघोषाने ज्ञानेश्वरी महापारायण सोहळ्याची अभूतपूर्व सांगता!



**सेलू,/:-** सेलू येथील अलंकापुरी नगरीत आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व भव्य ज्ञानेश्वरी महापारायण सोहळ्याची सांगता अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. १२ मार्च रोजी प्रारंभ झालेल्या या ज्ञानयज्ञाचा समारोप शुक्रवारी (दि. १९) 'ज्ञानोबा-तुकाराम' च्या गजरात आणि हजारो वारकरी भाविकांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या सात दिवसीय सोहळ्यात पहाटे काकडा भजनाने दिवसाची सुरुवात होत असे. त्यानंतर विष्णू सहस्त्रनाम, हनुमान चालीसा, ज्ञानेश्वरी पारायण, श्री महाभारत संदेश कथा आणि रात्री हरिकिर्तन अशा विविध आध्यात्मिक कार्यक्रमांनी संपूर्ण सेलू नगरी भक्तीरसात न्हाऊन निघाली होती. स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या अमृतवाणीमुळे भाविकांना अध्यात्मिक प्रबोधनाचा लाभ मिळाला.

या सोहळ्यात नामदेव महाराज चारठाणकर, मधुसूदन महाराज दैठणकर, स्वामी मनीषानंद पुरी, सोपान महाराज सानप, पुरुषोत्तम महाराज पाटील, बंडातात्या कराडकर यांच्यासह अनेक नामवंत कीर्तनकारांनी आपली कीर्तन सेवा सादर केली. सोहळ्याची सांगता ज्ञानेश्वर माऊली कदम (छोटे माऊली) यांच्या 'भक्ती सामर्थ्य' या विषयावरील प्रभावी काल्याच्या कीर्तनाने झाली.

सोहळ्यात तब्बल २१ हजारांहून अधिक भाविकांनी सहभाग नोंदवला. विशेष म्हणजे तालुक्यातील प्रत्येक गावातील ग्रामस्थांनी आपापल्या घरी स्वयंपाक करून महाप्रसादासाठी अन्नदान केले. सांगता दिनी पुरणपोळी, दूध, कढी-भात आणि बुंदी अशा पक्वन्नांचा महाप्रसाद भाविकांनी श्रद्धेने ग्रहण केला.

महिला भाविकांनी भांडी स्वच्छ करण्यापासून ते संपूर्ण परिसराच्या स्वच्छतेपर्यंत सर्व सेवा अत्यंत आनंदाने पार पाडल्या. 'सेवा हीच साधना' या भावनेतून साकारलेला हा सोहळा सेलूकरांसाठी अविस्मरणीय ठरला.

### छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर उत्साहात संपन्न; बामणी येथे नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**जिंतूर,/प्रतिनिधी-** महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले ''छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर'' बामणी मंडळात दिनांक २० मार्च रोजी ग्रामपंचायत कार्यालय बामणी येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

उपविभागीय अधिकारी सेलू मा. शैलेश लाहोटी यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिंतूरच्या तहसीलदार मा. शितल कच्छवे या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदार प्रशांत राखे, तालुका कृषी अधिकारी नितीन घुगे, उपसरपंच सुनीताबाई जाधव (बामणी), सरपंच सावित्रीबाई घोगरे (करंजी), उपसरपंच नारायण राठोड (असोला), सरपंच लक्ष्मीबाई जाधव (अंगलगाव) तसेच सरपंच भीमराव वाकळे (पिंपळगाव काजळे) उपस्थित होते.

यावेळी बामणी मंडळाच्या मंडळ अधिकारी श्रीमती आरती शेळके, सर्व ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, प्रतिष्ठित नागरिक व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

शिबिरामध्ये नागरिकांना विविध महसूल सेवा तत्काळ उपलब्ध करून देण्यात आल्या. यामध्ये प्रमाणपत्रे व विविध दाखले, ७/१२ व ८-अ उतारे, फेरफार प्रकरणे, नोंदीतील चुका दुरुस्ती, जमीन अभिलेख अद्ययावत करणे तसेच अकृषिक () संदर्भातील मार्गदर्शन यांचा समावेश होता. तसेच जमीन विषयक प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला.

यासोबतच नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती देत सामाजिक योजनांचा लाभ, ई-मोजणी अर्ज प्रक्रिया, तसेच पी.एम. किसान नोंदणीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिरात आरोग्य, कृषी, मुद्रांक व नोंदणी, पुरवठा आदी विभागांनी स्वतंत्र माहिती कक्ष उभारून नागरिकांना सविस्तर माहिती दिली. तहसीलदार शितल कच्छवे यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती देत नागरिकांना त्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

या शिबिराला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध सेवांचा लाभ घेतला. एकूणच हा उपक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.





परभणी --- आज दिनांक २०/०३/२०२६ रोजी कास्टट्राईब रा.प. कर्मचारी संघटना परभणी विभागातर्फे आयु. मंगेश कांबळे साहेब (यंत्र अभियंता चा) यांनी परभणी विभाग नियंत्रक पदाचा पदभार स्वीकारल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी परभणी विभागाचे वि.अध्यक्ष आकाश मुळे वि. सचिव , देविदास आगळे (आगळे दादा) , अशोक अंकुश (आगार सचिव), आनंद कांबळे (विकाशा अध्यक्ष) , दिलीप डुकरे ( कार्यशाळा कोषाध्यक्ष) अश्रोबा ठाकरे, प्रधान, सचिन गायकवाड, आदिल, नाईक, दिपके आदी उपस्थित होते.

# गोदाकाठच्या गावांना जोडण्यासाठी गोदावरी परिक्रमा मार्ग करावा

## दिल्लीत रामकिशन रौंदळे यांनी घेतली केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांची भेट

**मोहन धारासुरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी-** महाराष्ट्राच्या बहुतांश भागांना वरदान असलेल्या गोदावरी नदीच्या उगमापासून ते संगमापर्यंत दोन्ही बाजूंनी गोदावरी परिक्रमा मार्ग मंजूर करण्यात यावा. संपूर्ण गोदाकाठच्या गावांना असलेल्या रस्त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक तर या निमित्ताने होईलच पण सर्व महत्त्वाची तीर्थक्षेत्रे या निमित्ताने एकमेकांशी जोडली जातील. याकडे भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा ऑल इंडिया धनगर महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष रामकिशन रौंदळे यांनी लक्ष वेधले आहे. या मागणीसाठी त्यांनी दिल्ली येथे संसद भवनात सोमवारी (दि.१६) केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन निवेदन दिले.



गोदावरी परिक्रमा हा महाराष्ट्रातील बहुसंख्य जनतेच्या आस्थेचा विषय आहे. नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथून गोदावरी नदीचा प्रवास सुरू होतो आणि आंध्र प्रदेशापर्यंत जातो. सुमारे १४६५ किलोमीटर लांबीच्या या प्रवासात त्र्यंबकेश्वर, पैठण, नांदेड यासारखी अनेक महत्त्वाची तीर्थक्षेत्र जोडली आहेत. नाशिकमधील त्र्यंबकेश्वर (ब्रह्मगिरी टेकड्या) येथे उगम पावून गोदावरी नदी आग्नेय दिशेने वाहते. या मार्गावर त्र्यंबकेश्वर, नाशिक, कोपरगाव, पैठण, नांदेड, ज्ञान सरस्वती बासर, आणि राजमुंद्री (आंध्र प्रदेश) ही प्रमुख तीर्थक्षेत्रे येतात. ब्रह्मगिरी टेकड्यांभोवती आणि त्र्यंबकेश्वर परिसरात फिरून लघु परिक्रमा केली जाते.

नदीच्या उगमापासून (त्र्यंबकेश्वर) ते संगमापर्यंत (राजमुंद्री, आंध्र प्रदेश) हा प्रवास मोठा असल्याने तो पूर्ण होण्यासाठी अनेक दिवस लागतात. ही परिक्रमा गोदावरी नदीच्या दक्षिण किंवा उत्तर तटावरून (किनाऱ्याने) केली जाऊ शकते, ज्याला गोदा प्रदक्षिणा असेही म्हणतात. मात्र गोदाकाठच्या भागातील रस्त्यांची सध्याची दुरावस्था प्रचंड असल्याने शेतकऱ्यांची सुद्धा गैरसोय होत आहे. गोदाकाठच्या गावांमध्ये दळणवळणाची साधने फारशी नाहीत. या पार्श्वभूमीवर जर गोदावरी परिक्रमा असा मार्ग तयार झाला तर भाविकांसह शेतकरी व सर्व घटकांची सोय होणार आहे. या मार्गाला मंजुरी द्यावी अशी मागणी रौंदळे यांनी गडकरी यांना भेटून एका निवेदनाद्वारे केली.

### जोगवाडा शिवारात विजेचा कहर; बैल ठार, शेतकऱ्याचे ७० हजारांचे नुकसान

**जिंतूर,/प्रतिनिधी-** तालुक्यातील जोगवाडा शिवारात अवकाळी पावसासह झालेल्या विजेच्या कडकडाटामुळे एका शेतकऱ्याचा बैल ठार झाल्याची दुर्दैवी घटना घडली. ही घटना दि. १९ मार्च रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार, जोगवाडा येथील गट क्रमांक १३८ मधील शेतकरी हरिभाऊ आंबाजी वाळके यांच्या शेतात हा प्रकार घडला. अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे परिसरात विजांचा कडकडाट सुरू झाला आणि त्यातच वीज कोसळून त्यांच्या बैलाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे शेतकऱ्याचे अंदाजे ७० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाच्या वतीने तलाठी भीमराव वाकळे, महसूल सेवक योगेश शिंदे, पोलीस पाटील पि. पि. वाकळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. यावेळी विद्यमान प्रशासक संजय अंभोरे तसेच माजी उपसरपंच सुनील मस्के हेही उपस्थित होते.

अवकाळी पावसामुळे आधीच अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांवर या घटनेमुळे आणखी आर्थिक संकट कोसळले आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकरी हरिभाऊ वाळके यांनी प्रशासनाकडे तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे.

दरम्यान, परिसरात सतत बदलणाऱ्या हवामानामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, शासनाने अशा आपत्तीग्रस्तांना त्वरित मदत करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडूनही होत आहे.

## सोशल मिडीयावरील पोस्टची दखल; अपघातग्रस्त युवकाला मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून मदत

**परभणी,/प्रतिनिधी-** परभणी जिल्ह्यातील सुनेगाव (ता. गंगाखेड) येथील दुचाकी अपघातग्रस्त गंभीर जखमी झालेल्या तरूणाच्या उपचाराकरिता सोशल मिडीयावर मदतीचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाची मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी जिल्हा कक्षाने तातडीने दखल घेत पुढाकार घेतला. राज्य कक्षाच्या निर्देशानुसार माधव मंचकराव सूर्यवंशी (वय २१) या रुग्णाच्या उपचाराकरिता तात्काळ एक लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत मंजूर करण्यात आली. या मदतीमुळे त्याच्यावर वेळेत उपचार झाले.

गंगाखेड तालुक्यातील माधव घटनेच्या दिवशी कामानिमित्त दुचाकीने प्रवास करत असताना त्याचा भीषण रस्ते अपघात झाला होता. या अपघातात त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन मेंदूमध्ये रक्तस्त्राव झाला होता. उपचारासाठी लागणाऱ्या खर्चाची जुळवाजुळव करणे कुटूंबियांना शक्य नव्हते. कुटुंबासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले होते. माधवचे आई-वडील मजुरी करून उदरनिर्वाह करतात. शेतीचा कोणताही आधार नसून माधव स्वतः फिल्टर वॉटर प्लांटवर काम करून कुटुंबाला हातभार लावत होता. दरम्यान, माधवच्या मित्राने सोशल मिडीयावर मदतीचे आवाहन केले. त्यातून काही आर्थिक मदत जमा झाली; मात्र उपचाराचा संपूर्ण खर्च भागवण्यासाठी अतिरिक्त मदतीची गरज होती. दरम्यान, मुख्यमंत्री सहाय्यता निधी जिल्हा कक्ष परभणीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी इप्पर यांनी रुग्णालयात भेट देऊन रुग्ण व नातेवाईकांशी संवाद साधून राज्य कक्षाला माहिती दिली. कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी मदतीबाबत सकारात्मकता दाखवली. त्यानंतर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून अर्ज सादर करण्यात आला. परिणामी, माधवला वेळेत आर्थिक मदत मिळाली. माधव व त्याच्या कुटुंबीयांनी संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचे आभार व्यक्त केले.

प्रतिक्रिया---

नाशिक येथे झालेल्या प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, जिथे गरज आहे तिथे स्वतः धावून जा. प्रत्येक अधिकारी-कर्मचारी म्हणजे मीच आहे असे समजून काम करा, असे निर्देश दिले होते. त्याच प्रेरणेतून तातडीने पुढाकार घेत रुग्णाला मदत मिळावी या भावनेतून मी स्वतः रुग्णालयात जाऊन अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती दिली व राज्य कक्षाकडे पाठपुरावा केला आणि वेळेत मदत मिळाली, असे डॉ. बालाजी इप्पर यांनी सांगितले.

## तालुकास्तरीय वर्ड चॅम्पियन्स स्पर्धा उत्साहात संपन्न.....

**जिंतूर,/प्रतिनिधी-** दिनांक १८ मार्च २०२६ रोजी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, जिंतूर येथे तालुकास्तरीय वर्ड चॅम्पियन स्पर्धा उत्साहात व सर्वांच्या सहभागाने शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाली. माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद परभणी श्रीमती नतिशा माथुर यांच्या संकल्पनेतून वर्ड चॅम्पियन स्पर्धा संपूर्ण परभणी जिल्ह्यामध्ये राबवल्या जात आहे. विद्यार्थ्यांची इंग्रजी विषयाची शब्द संपत्ती वाढावी, इंग्रजी विषयाच्या कौशल्याचा विकास व्हावा, इंग्रजी विषयाची विद्यार्थ्यांना आवड निर्माण व्हावी या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धा शब्द अंकुर, शब्द विकास आणि शब्दप्रभाव या तीन गटांमध्ये तर शाळा स्तर, केंद्र स्तर, तालुका स्तर व जिल्हा स्तर या चार स्तरांमध्ये संपन्न होणार आहेत. जिंतूर तालुक्यात सर्वात प्रथम शाळा स्तरावर सदरच्या स्पर्धा घेण्यात आल्या. शाळा स्तरावर विजयी झालेल्या स्पर्धकांची केंद्र स्तरावर स्पर्धा घेण्यात आली. केंद्र स्तरावर विजयी झालेले स्पर्धक तालुकास्तरीय वर्ल्ड चॅम्पियन स्पर्धेमध्ये सहभागी झाले.

तालुकास्तरीय स्पर्धेचे अतिशय शिस्तबद्ध नियोजन सर्व विद्यार्थ्यांना स्पर्धेचा उत्तम अनुभव देण्याच्या उद्देशाने करण्यात आले. या स्पर्धेसाठी गटशिक्षणाधिकारी त्र्यंबक पोले, शिक्षण विस्तार अधिकारी तथा तालुकास्तरीय नोडल अधिकारी वर्ड चॅम्पियन स्पर्धा केशव घुगे, शिक्षण विस्तार अधिकारी दिलीप रेंगे, डी. यू राठोड, शैक्षणिक उपक्रम समन्वयक मयूर जोशी, वर्ड चॅम्पियन्स स्पर्धा समन्वयक जगदीश चिंचोले, योगिता संगवई, यांनी चांगल्या प्रकारचे नियोजन केले. स्पर्धेतील सर्व फेऱ्यांच्या परीक्षणासाठी भारत पांचाळ, माधव गडदे, संदीप आंबेकर, सचिन हजारे, अनिल स्वामी, प्रवीण भिसे, अरविंद दवणे, श्रीकांत दायमा, प्रमोद बोरकर यांच्यासह सर्व परीक्षकांनी पारदर्शक आणि नि:पक्षपातीपणे परीक्षणाचे काम पूर्ण केले. या स्पर्धेत शब्द अंकुर (३ री ते ५ वी) गटात प्रथम क्रमांक १.श्रावणी बाबासाहेब चिंधे , २. श्रेयस बाबासाहेब चिंधे जि.प.के.प्रा.शा. कन्या बोरी द्वितीय क्रमांक १.स्वरा गोविंद कांदे, २.स्वरा सिद्धार्थ असले जि प प्रा शा सोरजा तृतीय क्रमांक १.ईश्वरी गजानन मुंढे, २.प्राची रवी आघाव, जि प प्रा शा बेलखेडा, शब्द विकास ( ६ वी ते ८ वी ) गटात प्रथम क्रमांक १. अदिती अंकुश पारवे, २. अक्षरा सुहासराव देशपांडे, जि प प्रशाला दुधगाव द्वितीय क्रमांक १.आनंदी गोपाळराव हरकळ , २. प्रिया दीपक राठोड, जि.प.के.प्रा.शा. कन्या बोरी, तृतीय क्रमांक १. साक्षी भगवान शेळके, २. दिव्या संतोष अंभोरे, जि प प्रा शा येसेगाव शब्द प्रभाव (९ वी ) गटात प्रथम क्रमांक १. वेदिका शंकर उन्हाळे, २. श्रुती संतोष काळे, जि प प्रशाला दुधगाव, द्वितीय क्रमांक १. समिधा शरद महाजन, २. गायत्री ताराचंद बारवकर जि प प्रशाला कौसडी तृतीय क्रमांक १. रेणुका लक्ष्मण जावळे, २. शबनम शेख रियाज, जि प प्रशाला बोरी यांनी मिळवला. या स्पर्धकांना जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागी होता येणार आहे.

## जिंतूर बस स्थानकात 'शितलजल केंद्र' सुरू; प्रवाशांसाठी दिलासा, तोष्णीवाल चॅरिटेबल ट्रस्ट चा उपक्रम

**जिंतूर,/प्रतिनिधी:** शहरातील बस स्थानक परिसरात स्व. अयोध्याबाई रामनारायणजी तोष्णीवाल चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने उभारण्यात आलेल्या 'शितलजल केंद्रा'चे उद्घाटन ता १९ रोजी उत्साहात पार पडले. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांना थंड पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देणारा हा उपक्रम सर्व स्तरांतून कौतुकास पात्र ठरत आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संदीपभाई शर्मा महाराज होते, तर उद्घाटन नगराध्यक्ष प्रताप देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी गटनेते सचिन गोरे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष वसंतराव शिंदे, उपनगराध्यक्ष टीका खान पठाण , नगरसेवक गोपाळराव रोकडे, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस डॉ. पंडित दराडे, ज्येष्ठ विधिज्ञ मनोज सारडा, वाहतूक अधीक्षक सोनवणे, वाहतूक निरीक्षक संदीप भांबळे, पत्रकार विजय चोरडिया, शेख शकील, राजाभाऊ नगरकर आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ट्रस्टच्या वतीने प्रास्ताविक करताना तोष्णीवाल यांनी या उपक्रमामागील उद्देश स्पष्ट केला. गेल्या अनेक वर्षांपासून ट्रस्ट समाजोपयोगी उपक्रम राबवत असून, प्रवाशांच्या सोयीसाठी बस स्थानकात शितलजल केंद्र गेल्या पंधरा वर्षापासून सुरू असून ट्रस्टच्या माध्यमातून मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर अपंगासाठी साहित्य वाटप असे विविध कार्यक्रम घेतल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची कमतरता भासणाऱ्या प्रवाशांना या केंद्रामुळे मोठा दिलासा मिळणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.यावेळी उपस्थित मान्यवरांनीही आपल्या




भाषणातून या उपक्रमाचे कौतुक केले. समाजसेवेच्या भावनेतून उभारण्यात आलेले हे शितलजल केंद्र समाजासाठी प्रेरणादायी ठरेल, असे मत व्यक्त करण्यात आले. सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारच्या सुविधा निर्माण होणे ही काळाची गरज असून, नागरिकांनीही या उपक्रमाच्या माध्यमातून पाण्याची जपणूक करावी, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमावेळी चॅरिटेबल ट्रस्टचे सदस्य रमण तोष्णीवाल, नगरसेवक दत्ता कटारे, नागेश आकात, पुरुषोत्तम पोरवाल, सुनील तोष्णीवाल, मंचक देशमुख, निहाल अहमद, भागवत चव्हाण, रामप्रसाद कंठाळे, मनोहर कदम, गजानन तिखे यांच्यासह शहरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद पाचपिले तर आभार प्रदर्शन सुभाष चोपडे यांनी केले. उपक्रमामुळे बस स्थानकावर येणाऱ्या हजारो प्रवाशांना थंड पाण्याची सुविधा उपलब्ध होणार असून, समाजसेवेचा हा आदर्श उपक्रम ठरणार आहे.

## अग्रलेख...

# संसदेतील गोंधळाचे परिणाम लक्षात घ्या!

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा संपण्याच्या मार्गावर आहे. पाच राज्यांतील विधानसभा निवडणुका जाहीर झाल्यामुळे अर्थसंकल्पीय अधिवेशनातील राजकीय पक्षांचा उत्साह कमी होणे स्वाभाविकच. वित्त विधेयक संसदेत पारित झाल्यावर या अधिवेशनाचा गाशा गुंडाळला जाईल. अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात विरोधी पक्षांच्या आठ सदस्यांचे निलंबन मागे घेण्यात आले. यात काँग्रेसच्या सात तर माकपच्या एका सदस्याचा समावेश होता. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात या सदस्यांना अधिवेशनाच्या उर्वरित कालावधीपर्यंत निलंबित करण्यात आले होते. निलंबनाचा हा कालावधी २ एप्रिलला तसाही संपत आहे, पण आता २ एप्रिलपर्यंत हे अधिवेशन चालण्याची शक्यता दिसत नाही. त्यामुळे या सदस्यांचे निलंबन त्याच्या आधीच मागे घेण्यात आले.

गोंधळी सदस्यांचे निलंबन मागे घेण्याचा सरकारचा निर्णय मनाचा मोठेपणा दाखवणारा आहे. मात्र, हा निर्णय विनाशर्त नाही तर सशर्त आहे. विरोधी पक्षांच्या सदस्यांवर चांगल्या वागणुकीबाबत काही बंधने घालून त्यांचे निलंबन मागे घेण्यात आले. लोकसभा असो की राज्यसभा किंवा विधानसभा व विधानपरिषद, संसद व राज्य विधिमंडळांची ही सभागृहे लोकशाहीची पवित्र मंदिरे मानली जातात. ही सर्व सभागृहे ही चर्चेची आणि मुक्त मंथनाची व्यासपीठे आहेत. या सर्व सभागृहांत सर्व विषयांवर साधकबाधक चर्चा होणे अपेक्षित असते. या सभागृहांत आजकाल चर्चा होते का, मुक्त मंथन होते का, या प्रश्नाचे उत्तर दुर्दैवाने 'नाही' असेच आहे. कधीकाळी या सभागृहांत अभ्यासपूर्ण भाषणे होत. विरोधी पक्षांच्या अभ्यासू सदस्यांची भाषणे सत्ताधारी पक्षाचे नेते सभागृहात उपस्थित राहून ऐकायचे. सत्ता पक्षाच्या नेत्यांच्या भाषणाच्या वेळी विरोधी पक्षांचे नेतेही सभागृहात उपस्थित राहात होते. त्यावेळी सभागृहात खेळीमेळीचे वातावरण असायचे. विरोधकांकडे शत्रू म्हणून पाहण्याचा तो काळ नव्हता. पण आजचे चित्र काय आहे, या प्रश्नाचे उत्तर नुसते नकारात्मकच नाही तर वेदनादायकही आहे. आज संसदीय सभागृहात सत्ताधारी व विरोधक एकमेकांकडे शत्रू म्हणून पाहतात. विरोधी पक्ष तसेच सत्ताधारी पक्ष यांच्यातील संबंध गेल्या काही वर्षांत भारत-पाकिस्तानसारखे झाले आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे सुभाषितासारखे एक अतिशय प्रसिद्ध असे वाक्य आहे. ते असे की, आज विचारभिन्नता ही समस्या नाही तर विचारशून्यता ही खरी समस्या आहे. त्यातून एकदुसऱ्याबद्दल अनादराची, शत्रुत्वाची भावना वाढीस लागते. विरोधी पक्षांनी सत्ताधारी पक्षावर म्हणजे सरकारवर टीका केलीच पाहिजे; त्यांचा तो घटनादत्त अधिकार आहे. जनहिताचे निर्णय घेण्यात सरकार टाळाटाळ करीत असेल वा जनविरोधी निर्णय घेत असेल तर सरकारचे कान पकडण्याचा आणि पिळण्याचाही अधिकार विरोधी पक्षांना आहे. पण टीका करायची एवढ्यासाठीच ती करणे योग्य नाही. त्यामागे तर्कसंगती असली पाहिजे. विरोधी पक्षांत आहोत म्हणून सरकारच्या प्रत्येक निर्णयाला विरोध केलाच पाहिजे असे नाही. तसे होत असल्याने विधेयकावंरील अभ्यासपूर्ण चर्चा मागे पडू लागल्या आहेत. सभागृहात अध्यक्ष वा सभापतींच्या आसनासमोरील मोकळ्या जागेत हातात पोस्टर्स वा फलक घेऊन गोंधळ घालणे, घोषणाबाजी करणे अशा घटना वाढू लागल्या आहेत. विधेयकाच्या प्रती फाडत त्याचे तुकडे अध्यक्ष आणि सभापतींच्या आसनाच्या दिशेने भिरकावले जाऊ लागले आहेत. संसदीय लोकशाहीच्या दृष्टीने हे अजिबात चांगले लक्षण नाही. भाजपा हा २०१४ पासून केंद्रीय सत्तेत आहे. त्याच्या आधी १९९९ ते २००४ च्या सत्ताकाळाचा मोठा अपवाद वगळता तो दीर्घकाळ विरोधी पक्षातच होता. तेव्हा भाजपाचे सदस्य अध्यक्ष वा सभापतींच्या समोरील मोकळ्या जागेत येत नव्हते असे नव्हे. भाजपा सदस्यांच्या हातात घोषणांचे पोस्टर्स वा फलक नसायचे असेही नाही. पण, सभागृहात विरोध व्यक्त करताना एक मर्यादा भाजपाचे सदस्य पाळत होते. आज संसदेच्या दोन्ही सभागृहांची स्थिती काय आहे, असे कुणी विचारले तर त्याचे उत्तर देणाऱ्याला घाम यावा. राज्यसभा हे ज्येष्ठांचे सभागृह मानले जाते. या सभागृहात येणारे सदस्य हे वयाने, ज्ञानाने आणि अनुभवानेही परिपक्व असतात. त्यामुळे या सभागृहातील सदस्यांकडून अधिक प्रगल्भ, संयमित आणि जबाबदारीच्या वागणुकीची अपेक्षा असते. लोकसभेत येणारे सदस्य सळसळत्या रक्ताचे आणि संसदीय कामकाजाचा अनुभव नसलेले असतात. त्यामुळे त्यांच्यात जोश असतो. त्यांचे चुकीचे वर्तन आक्षेपार्ह असले, तरी त्यांना नवखे म्हणून एखादवेळा माफ करता येणे शक्य आहे. राज्यसभेच्या सदस्यांकडून मात्र परिपक्व वर्तनाचीच अपेक्षा आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेला पंतप्रधानांना उत्तर देता आले नाही. यावेळी पहिल्यांदा संसदीय प्रथा-परंपरा आणि संकेतात असा खंड पडला. पंतप्रधान हे लोकसभेचे नेते असतात. त्यांनाच सभागृहात बोलू दिले जात नसेल तर आपल्या संसदीय लोकशाहीचे अध:पतन झाले, असे म्हणावे लागेल. लोकसभेत एक स्थिती अशी उद्भवली होती की, विरोधी पक्षांच्या महिला सदस्यांनी अतिशय आक्रमक होत सत्ताधाऱ्यांच्या बाजूकडे धाव घेतली होती. सत्तारूढ बाजूच्या पहिल्या बाकावर सभागृहाचे नेते म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आसन आहे तर दुसऱ्या आसनावर सभागृहाचे उपनेते-संरक्षण मंत्री राजनाथ सिंह बसतात. विरोधी पक्षांच्या महिला सदस्यांकडून काही अनुचित प्रकार घडण्याचा संकेत मिळाल्यामुळे लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी पंतप्रधान मोदी यांना सभागृहात येण्यापासून रोखले आणि एक दुर्दैवी तसेच अनुचित घटना टळली. अन्यथा तो दिवस संसदीय लोकशाहीच्या इतिहासातील सर्वांत काळा दिवस ठरला असता. त्या दिवशी सभागृहात काय झाले असते, याची नुसती कल्पना केली तरी अंगावर काटे येतात. याच गोंधळाची परिणती विरोधी पक्षांच्या आठ सदस्यांच्या निलंबनात झाली. लोकसभेत वा राज्यसभेत सदस्य निलंबित होण्याची ही पहिली आणि शेवटचीही घटना नाही. सुमित्रा महाजन लोकसभेच्या अध्यक्ष असताना शंभर-शंभर सदस्यांना एका दिवशी निलंबित करण्यात आले होते. आजकाल संसदेच्या दोन्ही सभागृहांत प्रश्नोत्तरांच्या तासात गोंधळ होणे हा परिपाठ झाला आहे. सामान्यपणे प्रश्नोत्तराचा तास हा संसदेच्या दोन्ही सभागृहात खूप महत्त्वाचा मानला जातो. या तासात फक्त सत्ताधारी पक्षांच्या सदस्यांचेच प्रश्न असतात असे नाही, तर विरोधी पक्षातील सदस्यांचेही असतात. आपल्या मतदारसंघातीलच नव्हे तर जिल्ह्यातील आणि राज्यातील प्रश्नांना वाचा फोडणे ही दोन्ही पक्षांच्या सदस्यांची जबाबदारी असते. आपल्या प्रश्नावर संबंधित खात्याच्या मंत्र्यांचे उत्तर समाधानकारक नसेल तर मंत्र्याला कोंडीत पकडण्याची, सरकारला घेरण्याची संधी विरोधी पक्षांच्या सदस्यांना मिळत असते. पण सभागृहात गोंधळ घालून विरोधी सदस्य ही संधी गमावतात, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. गोंधळामुळे पीठासीन अध्यक्ष वा सभापतीला कामकाज स्थगित करावे लागते. सभागृहाचे कामकाज स्थगित झाल्यामुळे अप्रत्यक्षपणे सरकारचा फायदा होतो तर विरोधी पक्ष सदस्यांचे नुकसान. पण हे शहाणपण विरोधी पक्षांच्या सदस्यांना येईल तो सुदिन म्हटला पाहिजे. त्यामुळे सभागृहात सरकारला घेरणे, विरोध करणे समजण्यासारखे असले तर गोंधळ घालण्याच्या विरोधकांच्या कृत्याचे कधीच समर्थन करता येणार नाही. विरोधी पक्षनेते पदी राहुल गांधींसारखा अपरिपक्व नेता असल्यावर यापेक्षा वेगळी अपेक्षाही करता येत नाही. विरोधकांमध्ये वयस्क नेते आहेत. ते राहुल गांधी यांना मर्यादा सांभाळण्यास का सांगत नाहीत, हा प्रश्नच आहे. यातून फक्त संसदेच्या कामांत व्यत्यय येतोय, असे नव्हे. दीडशे कोटी लोकांच्या आशा-आकांक्षांचे केंद्र असलेल्या संसदेचे कामकाज असे चालते तेव्हा समाजातही नैराश्याची भावना निर्माण होते. ती घालवण्याची जबाबदारी जशी सत्ताधाऱ्यांची आहे, तशी ती विरोधकांचीही आहे. ती त्यांच्या लक्षात यावी आणि संसदेचे कामकाज चांगल्या पद्धतीने चालावे, एवढीच अपेक्षा करता येते.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# बालपण नको देवा?

आजच्या वेगवान आणि डिजिटल युगात सोशल मीडिया आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. परंतु, या माध्यमाच्या अतिवापरामुळे आणि अनियंत्रितपणामुळे काही गंभीर सामाजिक प्रश्नही निर्माण झाले आहेत. यातीलच एक अत्यंत संवेदनशील आणि चिंताजनक विषय म्हणजे लहान मुलांशी संबंधित अश्लील नृत्याचे व्हिडीओ, जे सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहेत. नुकताच एक व्हिडीओ पाहण्यात आला, ज्यात एका नामांकित सीबीएसई इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील कार्यक्रमात काही मुली 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' या लोकप्रिय चित्रपटातील गाण्यावर टॉवेलमध्ये नृत्य करीत होत्या. या कार्यक्रमाला लहान मुलेही प्रेक्षक म्हणून उपस्थित होती आणि विशेष म्हणजे, शाळेचा बॅनर मागे स्पष्ट दिसत होता. अशी घटना केवळ याच शाळेत घडली आहे असे नव्हे, याआधीही शाळांचे असे व्हिडीओ व्हायरल झाले होते.

भारत हा संस्कृती आणि परंपरांचा देश आहे. नम्रता, मर्यादा, आदर, वडीलधाऱ्यांचा मान राखणे आणि वयानुसार योग्य वर्तन करणे ही भारतीय संस्कृतीची मूलभूत तत्त्वे आहेत. बालपणीच मुलांना नैतिक मूल्यांची शिकवण दिली जाते, ज्यामुळे ते सुजाण आणि जबाबदार नागरिक बनतात. कुटुंबात आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मुलांना योग्य-अयोग्य, चांगले-वाईट याची जाणीव करून दिली जाते. भारतीय परंपरेत कलेला नेहमीच उच्च स्थान दिले गेले आहे, परंतु ती कला मर्यादा आणि नैतिकतेच्या चौकटीत असावी, अशी अपेक्षा असते. आपल्या संस्कृतीत बालपण हे निरागसतेचे प्रतीक मानले जाते आणि त्याचे पावित्र्य जपण्याची जबाबदारी समाजातील प्रत्येक घटकावर असते.

जागतिकीकरणामुळे पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव भारतीय समाजावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अनेकदा 'आधुनिक' दिसण्याच्या किंवा 'प्रगत' असल्याचा दावा करण्याच्या नादात काही वेळा सांस्कृतिक मूल्यांची पायमल्ली केली जाते. पाश्चात्त्य संस्कृतीत काही प्रमाणात अधिक मोकळेपणा असला, तरी लहान मुलांसाठी 'बोल्डनेस' आणि 'अश्लीलता' यातील सीमारेषा स्पष्टपणे आखलेली असते. दुर्दैवाने भारतात अनेकदा या दोन्ही संकल्पनांमध्ये गल्लत केली जाते. 'बोल्डनेस' म्हणजे केवळ शारीरिक प्रदर्शन नव्हे, तर विचारांची आणि अभिव्यक्तीची स्पष्टता असते. परंतु, आजकाल 'बोल्डनेस'च्या नावाखाली लहान मुलांना अश्लीलतेकडे ढकलले जात आहे, जे त्यांच्या मानसिक आणि भावनिक विकासासाठी अत्यंत हानिकारक ठरू शकते. 'डीडीएलजे' मधील अभिनेत्री काजोलने 'मेरे ख्वाबों में जो आए' या गाण्यावर केलेले नृत्य हे सोज्वळ आणि कलात्मक होते, असे म्हणावे लागेल. मात्र आताच्या व्हायरल व्हिडीओमधील नृत्यात मात्र ती सोज्वळता हरवलेली दिसते; उलटपक्षी ती अश्लीलतेकडे झुकणारी आहे. हा फरक समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण याच फरकामुळे बालपणाचे पावित्र्य जपले जाते.

लहान मुलांच्या संगोपनात पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. पालकांनी आपल्या मुलांना योग्य-अयोग्य शिकविणे, सोशल मीडियाच्या वापराबाबत मार्गदर्शन करणे आणि त्यांच्यावर योग्य संस्कार करणे आवश्यक आहे. परंतु, आजकाल अनेक पालक 'व्हायरल' होण्याच्या हव्यासापोटी आपल्या मुलांच्या निरागसतेचा बळी देत आहेत. लाईक्स, व्ह्यूज आणि फॉलोअर्स मिळविण्यासाठी काही पालक आपल्या मुलांना अयोग्य कंटेंट सादर करण्यास प्रवृत्त करतात. यामुळे मुलांचे बालपण हिरावले जाते आणि त्यांना अवेळी लैंगिक किंवा अश्लील कंटेंटच्या संपर्कात आणले जाते. 'माझं मूल किती हुशार आहे', 'किती बोल्ड आहे' हे दाखवण्याच्या नादात पालक नकळतपणे आपल्या मुलांचे भविष्य धोक्यात घालत आहेत. लहान मुलांचे मन अत्यंत कोमल असते. त्यांच्यावर अशा प्रकारच्या दृश्यांचा किंवा नृत्यांचा खोलवर परिणाम होऊ शकतो. त्यांना लैंगिकतेबद्दल चुकीची माहिती मिळू शकते, ज्यामुळे त्यांच्या मनात गोंधळ निर्माण होऊ शकतो. पालकांनी हे समजून घेणे आवश्यक आहे की, 'बोल्डनेस' वगैरे मोठे झाल्यावर, वयात आल्यावर ठीक आहे, पण लहानपणी हे का हवे आहे? बालपण हा निरागसता, धम्माल-मस्ती, अभ्यास आणि नैसर्गिक विकासाचा काळ असतो. या काळात मुलांना त्यांच्या वयानुसार योग्य अनुभव मिळणे आवश्यक आहे. त्यांना सुरक्षित आणि संस्कारक्षम वातावरण देणे ही पालकांची नैतिक जबाबदारी आहे. शिक्षण संस्थांची जबाबदारी केवळ शैक्षणिक ज्ञान देण्यापुरती मर्यादित नाही, तर मुलांना नैतिक आणि सांस्कृतिक मूल्यांची शिकवण देणे ही देखील त्यांची जबाबदारी आहे. शाळेच्या आवारात किंवा शाळेच्या नावाखाली आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये सांस्कृतिक मर्यादांचे पालन करणे आवश्यक आहे. 'आधुनिकता' किंवा 'प्रगती' या नावाखाली मूल्यांचा ऱ्हास करणे हे शिक्षण संस्थांसाठी योग्य नाही. ज्या ठिकाणी संस्कारांची बीजे पेरली पाहिजेत, तिथे जर अश्लीलतेचे धडे दिले जात असतील, तर ते अत्यंत गंभीर आहे. शाळा हे दुसरे घर असते, जिथे मुलांना सुरक्षित आणि पोषक वातावरण मिळायला हवे. शिक्षकांनी आणि शाळा प्रशासनाने हे सुनिश्चित केले पाहिजे की, कोणत्याही कार्यक्रमात मुलांच्या वयाला आणि भारतीय संस्कृतीला धरूनच कार्यक्रम सादर केले जातील. केवळ स्पर्धेत जिंकण्यासाठी किंवा 'नवीन काहीतरी' करण्याच्या नावाखाली मुलांच्या निरागसतेशी खेळणे हे अक्षम्य पाप आहे. शिक्षण संस्थांनी आपल्या विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये रुजविण्यासाठी आणि त्यांना जबाबदार नागरिक बनविण्यासाठी अधिक सक्रिय भूमिका बजावणे आवश्यक आहे. सोशल मीडिया ही एक दुहेरी तलवार आहे. तिचा योग्य वापर केल्यास ती वरदान ठरते, अन्यथा ती शापही ठरू शकते. 'व्हायरल' होण्याच्या हव्यासापोटी अनेकदा मर्यादांचे उल्लंघन केले जाते. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मची या संदर्भात मोठी जबाबदारी आहे. त्यांनी अशा अयोग्य सामग्रीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर समाज म्हणून आपलीदेखील जबाबदारी आहे. अशा व्हिडीओजला प्रोत्साहन न देणे, ते शेअर न करणे आणि त्याबद्दल आवाज उठवणे हे आपले कर्तव्य आहे. भारतीय मूल्ये आणि आधुनिकतेचा समतोल साधणे ही आजच्या काळाची गरज आहे. आपल्या संस्कृतीला आणि मूल्यांना विसरणे म्हणजे 'आधुनिक' होणे नव्हे, तर त्यांना जपून प्रगती करणे होय. पालक, शिक्षण संस्था आणि संपूर्ण समाजाची ही सामूहिक जबाबदारी आहे की, त्यांनी बालमनाचे संरक्षण करावे आणि त्यांना योग्य संस्कार द्यावेत. सोशल मीडिया साक्षरता वाढविणे आणि नैतिकतेचे शिक्षण देणे हे यावरचे काही महत्त्वाचे उपाय आहेत. मुलांना सोशल मीडियाचा वापर कसा करावा, काय योग्य आहे आणि काय अयोग्य आहे, हे शिकविणे आवश्यक आहे. केवळ लाईक्स आणि व्ह्यूजसाठी मुलांच्या निरागसतेचा बळी देणे हे समाजासाठी घातक आहे. या गंभीर विषयावर समाजाने एकत्र येऊन विचार करणे आणि योग्य पावले उचलणे अत्यंत आवश्यक आहे; जेणेकरून आपल्या भावी पिढीला सुरक्षित आणि संस्कारक्षम वातावरण मिळेल आणि त्यांचे बालपण खऱ्या अर्थाने फुलू शकेल.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# शेतजमिनीचा पोत वाढविणे आवश्यक

रासायनिक खतांचा अतिवापर, विविध प्रकारच्या कीटक व रोगनाशकांची पिकांवर फवारणी यामुळे शेतजमिनीचा पोत (कस) कमी होत आहे. शेतीतून जास्तीत जास्त उत्पादन मिळण्यासाठी शेतकरी विविध रासायनिक खतांचा वापर करीत आहेत. आपल्या जमिनीला कोणती द्रव्ये आवश्यक आहेत, याबाबत जाणून न घेताच रासायनिक खतांचा अतिवापर केला जात आहे. पिकांवर आलेल्या विविध रोग व कीड नियंत्रणासाठी विविध प्रकारची रासायनिक औषधी फवारली जात आहेत. त्यामुळे अन्नधान्यात अजाणतेपणी विष मिसळले जात आहेच; शिवाय आपल्या शेतजमिनीचा पोत म्हणजे कसदारपणादेखील आपण आपल्याच हाताने कमी करीत आहोत. त्यामुळे जमिनीचा सुपीकपणा जाऊन ती काळी भुसभुशीत जमीन पडीक होण्याच्या स्थितीकडे जात आहे. तेव्हा, शेतजमिनीचा पोत कायम राखणे आज अतिशय आवश्यक झाले आहे. पूर्वी जवळपास सर्वच शेतकऱ्यांकडे गायी-म्हशी असायच्या. किमान एक बैलजोडी तर असायचीच. त्यामुळे दरवर्षी शेतात घरचे शेणखत टाकले जात होते. शेणखत मिळाल्यामुळे जमिनीला आवश्यक ती सर्व घटकद्रव्ये मिळत होती. ती मिळाल्याने रासायनिक खतांचा वापर अभावानेच केला जात होता. आज शेतकऱ्यांकडील गायी-म्हशींची संख्या फारच कमी झाली आहे. नसल्यातच जमा आहे. बैलजोड्याही फार कमी कास्तकारांकडे आहेत. शेतीची जवळपास सर्वच कामे ट्रॅक्टरद्वारे केली जातात. तसेच, पीक पद्धतीत बदल झाल्याने चाऱ्याचा अभाव निर्माण झाला आहे. त्यामुळे शेतकरी बैलजोडी किंवा गायी-म्हशी ठेवत नाहीत. परिणामी शेणखत शेतात टाकले जात नाही. याचा परिणाम जमिनीचा कसदारपणा कमी होण्यावर झाला आहे.

सध्या बुलढाणा जिल्ह्यात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शेती हा उपक्रम हाती घेतला आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील धरणांचे खोलीकरण करण्याचे काम केले जात आहे. धरण खोलीकरणातून निघालेला गाळ शेतकऱ्यांना मोफत त्यांच्या शेतात टाकण्याची परवानगी देण्यात आली आहे. या उपक्रमामुळे नदीकाठच्या गावातील शेतकऱ्यांनी लोकसहभागातून नदीपात्राचे खोलीकरण करून त्यातील गाळ ट्रॅक्टरने आपआपल्या शेतात टाकणे सुरू केले आहे. ज्या शेतकऱ्यांनी धरणातील गाळ आपल्या शेतात टाकला त्यांची शेती गाळयुक्त होणार आहे. गाळाची शेती झाल्याने तिची सुपीकता वाढून उत्पादनातही वाढ होणारच आहे. लोकसहभागातून हे काम केले जात असल्याने शासनाचा या कामावरील खर्च वाचला आहे. तसेच, शेतकऱ्यांना मोफत गाळ मिळाल्याने त्यांची शेती सुपीक होणार आहे. तर, नदीपात्राचे खोलीकरण झाल्याने धरणातील पाणी साठ्यात वाढ होणार आहे. पात्र खोल झाल्याने धरणात जास्त दिवस पाणी राहणार आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. धरणातील जलसाठा वाढल्याने आसपासच्या भूगर्भातील पाण्याच्या पातळीतही वाढ होणार आहे. त्यामुळे विंधन विहिरी, विहिरी इत्यादी जलस्रोतातील जलस्तरात वाढ होणार आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची समस्या सुटण्यासोबतच शेतकऱ्यांना सिंचनासाठीही पाणी उपलब्ध होणार आहे. सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाल्याने शेतकरी खरिपासोबतच रबीची पिके घेऊ शकणार आहे. पाणी उपलब्ध झाल्याने फळबाग लागवड करता येणार आहे. याचा शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. सोयाबीन, कापूस, तूर इत्यादी खरिपाच्या पिकांसोबत गहू, हरभरा, लिंबू लागवड व इतर फळबाग लागवड केल्यामुळे शेतकऱ्यांना तीन ते चार पिके सहज घेता येतील. त्यामुळे उत्पन्नातही वाढ होणार आहे. एवढे फायदे हे या उपक्रमामुळे होणार आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा तालुक्यातील साखरखेर्डा येथील भोगावती नदीवर सिंदी-साखरखेर्डा आणि सवडद येथे केटीवेअर तयार केले आहेत. त्यामुळे किमान आठ महिने या नदीत पाणी साठून राहते. या नदीपात्रात प्रचंड गाळ साचला होता. हा गाळ शेतीसाठी उपयुक्त असून रासायनिक खतापेक्षा पिकांसाठी पोषक आहे. हे ओळखून नदीकाठच्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन नदीतील गाळ उपसून शेतात टाकण्याचे काम सुरू केले आहे. सिंदीचे सरपंच अशोक खरात यांनी पुढाकार घेऊन शेतकऱ्यांच्या मदतीने लोकसहभागातून गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार हा उपक्रम राबविण्याचे ठरविले आहे. त्याला शेतकऱ्यांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. हा बुलढाणा पॅटर्न इतर जिल्ह्यातही राबविला गेल्यास नदीपात्रांचे खोलीकरण करण्यास शासनाला एक रुपयाही खर्च येणार नाही. शेतकऱ्यांना त्यांची शेती गाळयुक्त झाल्याने रासायनिक खतांवरील खर्च टाळून बचत करता येईल. तसेच, उत्पादन वाढल्यामुळे त्यांच्या उत्पन्नातही वाढ होईल, हे नक्की. तेव्हा शासनाने महाराष्ट्रात हा उपक्रम राबवावा, असे वाटते.

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# सेक्युलर की सिलेक्टिव्ह?

महाराष्ट्राच्या राजकारणात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की त्यांच्या वक्तव्यांमुळे, वागणुकीमुळे आणि भूमिकांमुळे सतत वाद निर्माण होतात. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड हे त्यापैकी एक प्रमुख नाव आहे. स्वतःला प्रगल्भ, विचारवंत आणि पुरोगामी म्हणून सादर करण्याचा प्रयत्न करणारे आव्हाड प्रत्यक्षात अनेकदा अशा भूमिका घेतात की, ज्यामुळे समाजात तणाव निर्माण होतो; मुळात तो निर्माण करणे हाच त्यांचा मूळ उद्देश असतो. कारण आव्हाड ज्या भागातून निवडून येतात त्या भागातील बहुतांश मतदार हे विशिष्ट समाजाचे असल्याने त्यांना खूश करण्यासाठी हा सर्व प्रकार ते सातत्याने करीत असतात. त्यांनी केलेले वक्तव्य मोठा गहजब करून जातात. मात्र, त्यानंतरचा त्यांचा माफीनामा कुठल्यातरी कोपऱ्यात जातो. त्यामुळे वक्तव्ये करून निर्माण झालेल्या वादातून आव्हाडांचा लांगूलचालनाचा उद्देश हा सफल होत असतो.

अलिकडच्या काळात वारंवार दिसून आलेली बाब म्हणजे आव्हाड यांची वक्तव्ये ही केवळ विरोधासाठी विरोध करण्याच्या पातळीवर जातात. हिंदुत्व, परंपरा आणि विशेषतः छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या महान ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांबाबत बोलताना आवश्यक तो आदर, संवेदनशीलतेचा अभाव स्पष्टपणे जाणवतो. शिवाजी महाराज हे केवळ एका विचारसरणीचे प्रतीक नसून संपूर्ण महाराष्ट्राचे, देशाचे दैवत आहेत. त्यांच्या संदर्भात अर्धवट माहिती किंवा कुत्सित भूमिका घेणे हे केवळ अयोग्यच नाही तर समाजाच्या भावनांवर घाव घालणारे ठरते. राजकारणात किंवा राजकारणासाठी तरी किमान महाराजांच्या नावाचा वापर करू नये. महाराजांच्या नावाला कलंकित करू नये एवढीच माफक अपेक्षा राजकारण्यांकडून आहे.

विधानसभेत घडलेला अलिकडचा प्रसंग याचेच उदाहरण आहे. आपल्या वक्तव्यांमुळे निर्माण झालेल्या संतापानंतर आव्हाड यांना अखेर माफी मागावी लागली. पण प्रश्न असा आहे की, वारंवार अशी वेळ का येते? माफी मागून विषय संपतो का? की, त्यामागील विचारसरणी आणि वृत्ती यावर गंभीर प्रश्न उपस्थित होतात? एखाद्या राजकीय नेत्याने चूक केली तर त्यातून शिकणे अपेक्षित असते; येथे मात्र आव्हाड पुन्हा पुन्हा तेच करताना दिसून येतात. सातत्यानं चुका करतात, वादग्रस्त वक्तव्य करतात आणि माफीदेखील मागतात. असा निर्लज्ज प्रकार खपवून तरी कसा घ्यायचा?



स्वतः चर्चेत राहण्यासाठी, स्वतःची प्रसिद्धी मिळविण्यासाठी मुद्दाम वादग्रस्त विधान करणे, हा आव्हाड यांच्या राजकीय शैलीचा भाग झाला आहे. एकीकडे मी सेक्युलर असल्याचा दावा करणारे आव्हाड हिंदू परंपरांवर टीका करणे, देवीदेवतांवर टीका करणे, ऐतिहासिक व्यक्तींवर शंका उपस्थित करणे हा सगळा खटाटोप समाजातील एका विशिष्ट घटकाला खूश करण्यासाठी करतात. एका समाजाला खूश करण्यासाठी दुसऱ्याच्या भावना दुखावणे हा आव्हाडांच्या सेक्युलरिज्मचा प्रकार कळण्यापलीकडे आहे. आव्हाडांची ही कृती सेक्युलर की सिलेक्टिव्ह, असा प्रश्न निर्माण होतो.

तत्कालीन राज्यपालांनी केलेले महाराजांचे उदाहरण देऊन केलेल्या वक्तव्यानंतर राळ उठविण्यात हेच आव्हाड अग्रेसर होते आणि तेच आव्हाड, केवळ हिंदू देवी-देवतांचाच नव्हे, तर तुकाराम महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचादेखील अवमान वेळोवेळी करताना दिसले. तुकाराम महाराजांचा खून झाल्याचे वादग्रस्त वक्तव्य आव्हाडांनी मागील काळात केले होते. त्यांचा एकेरी उल्लेख केला होता. न्यायव्यवस्थेत आरक्षण नाकारून बाबासाहेबांनी ८० टक्के लोकांवर अन्याय केला असे वक्तव्य करणे, त्यानंतर बाबासाहेबांचा फोटो फाडणे, एवढेच नव्हे तर देशाचा ध्वज भर सभागृहात उलटा फडकविण्यासारखे कृत्य करून आव्हाडांनी सर्वच मर्यादा ओलांडल्या आहेत. स्वतःला शाहू-फुले-आंबेडकरांचा वारस आणि सेक्युलर म्हणवणाऱ्या या आव्हाडांनी कुठलीही अशी मर्यादा नाही जी ओलांडली नाही. जगात आणि देशात अशा प्रकारची विक्षिप्त माणसे आढळतात जी विचारपूर्वक नव्हे तर भावनिक, आक्रमक आणि कधी कधी बेफिकीर पद्धतीने बोलतात. कॅमेरा दिसला की काहीतरी बोलायचे, लक्ष वेधून घ्यायचे आणि त्यातून वाद निर्माण झाला तरी चालेल; मात्र आपला राजकीय स्वार्थ साधायचा, असे प्रकार ते करीत असतात. ही वृत्ती खरोखर धोकादायक आहे. कारण राजकारण हे केवळ लोकप्रियतेसाठी नसते, तर जबाबदारीने वागण्यासाठी असते. पण जबाबदारीनं वागणं हा शब्द जितेंद्र आव्हाडांच्या शब्दकोशातच नाही. प्रियांक खडगे, स्टॅलीन अशी काही उदाहरणेही याच संदर्भात लक्षात घेण्यासारखी आहेत. या काही नेत्यांनी देवीदेवतांवर अनावश्यक टीका करून राजकीय पोळी शेकण्याचा प्रयत्न केला. समाजमाध्यमं आणि प्रसारमाध्यमं यांच्यामुळे अशा वक्तव्यांचे परिणाम तत्काळ दिसून येतात. लोकं आता जागरूक झाले आहेत. त्यामुळे कोणते वक्तव्य केवळ प्रसिद्धीसाठी आहे आणि कोणते वास्तवावर आधारित आहे, हे ओळखू लागले आहेत. विरोधही करू लागले आहे. त्यामुळे आता असे प्रकार फार काळ चालणार नाही. हे जरी सत्य असले, तरी काही अराजकीय तत्त्व आणि माथेफिरू लोकांचीही कमी या देशात नाही. त्यामुळे अशा लोकांचं फावत आहे.

जितेंद्र आव्हाड यांच्या बाबतीत सर्वात मोठा प्रश्न हा आहे की, औरंगजेब, टिपू सुलतान आणि त्यांना 'रहनुमा' मानणाऱ्यांच्या प्रतीकांच्या बाबतीत बोलताना जी संवेदनशीलता आव्हाड राखतात, पाळतात ती आमच्या प्रतीकांच्या बाबतीत का पाळत नाहीत? त्यांच्या भूमिकांमध्ये दोन समाज किंवा दोन प्रतीकांच्या बाबतीत हा भेदभाव कसा? टीका करणे हा लोकशाहीचा भाग आहे, परंतु ती टीका अभ्यासपूर्ण, संयमित आणि वस्तुनिष्ठ असावी लागते. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे ती सर्वसमावेशक असली पाहिजे, पक्षपाती नसावी, सिलेक्टिव्ह नसली पाहिजे. मात्र, आव्हाडांच्या प्रत्येक भूमिका या सिलेक्टिव्ह आणि पक्षपाती असल्याचं वेळावेळी अधोरेखित झाले आहे. केवळ लक्ष वेधणे आणि चर्चेत राहण्यासाठी असे कृत्य आव्हाड करीत असतात. मात्र, शिवाजी महाराज, हिंदू संस्कृती किंवा कोणतीही परंपरा यावर बोलताना संवेदनशीलता आवश्यक असल्याचं भान आव्हाडांनीच नव्हे, तर प्रत्येकानं राखलं पाहिजे. कारण या गोष्टी केवळ राजकीय मुद्दे नाहीत तर त्या लाखो लोकांच्या भावना, श्रद्धा आणि अस्मितेशी जोडलेल्या आहेत. त्या पातळीवर जाऊन जर कोणी वारंवार वाद निर्माण करीत असेल, तर त्यावर स्वाभाविकच गंभीरतेने विचार करण्याची गरज आहे. तसे विधानसभाध्यक्षांनी आव्हाडांना अंतिम चेतावनीच दिली आहे. यातून तरी आव्हाडांच्या वर्तणुकीत काही बदल होतात का? हे येत्या काळात कळेलच.

शेवटी, लोकशाहीत प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. पण त्या अधिकारासोबत जबाबदारीही येते. जितेंद्र आव्हाड यांच्यासारख्या नेत्यांनी ही जबाबदारी ओळखली नाही, तर त्याचे दुष्परिणाम केवळ त्यांच्या वैयक्तिक प्रतिमेवर नाही, तर त्याचा व्यापक परिणाम समाजावरही होतो. श्रीलंका, सीरिया, बांग्लादेश, नेपाळ, म्यानमार यासारख्या देशांची आणि जगातील युद्धजन्य परिस्थिती बघितल्यानंतर आज गरज आहे, ती संयम, संवेदनशील आणि समाजहित जपणाऱ्या परिपक्व राजकारणाची, समाजकारणाची.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### रेल्वे प्रवाशांची सुरक्षा



मुंबई उपनगरी रेल्वेच्या विस्तारीकरणावर भर दिला जात असताना, ज्यांच्यासाठी करायचं त्या प्रवाशांच्या सुरक्षेकडे मात्र दुर्लक्ष तर होत नाही ना, असा प्रश्न पडतो. एका दिवसात तब्बल १४ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची नोंद मुंबई रेल्वे पोलिसांकडे झाली, असे वाचनात आले. ही घटना अत्यंत चिंताजनक असून धक्कादायकही आहे. दररोज लाखो प्रवासी जीव मुठीत धरून प्रवास करतात. रेल्वे रुळ ओलांडताना होणारे अपघात ही गंभीर समस्याच बनली आहे. रेल्वे प्रशासनाने केवळ प्रकल्पांची घोषणा न करता त्यांची वेळेत आणि प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. शिवाय प्रवाशांमध्ये जनजागृती, सुरक्षित पादचारी पूल, कुंपण, आणि महत्वाचे म्हणजे कडक कायदे, नियमांचा धाक वाटेल, भीती वाटेल अशा कायदे, नियमांची अंमलबजावणी यावर तातडीने भर देणे आवश्यक आहे. प्रवाशांचे जीव वाचवणे हीच खरी प्राथमिकता असली पाहिजे.

**विश्वनाथ पंडित** /ठाणे

### तरुण भारतमुळे मैत्री

दैनिक तरुण भारतची पुणे आवृत्ती ५ मार्च २०२६ ला सुरू झाली. दिनांक ७ मार्चच्या 'वाचक पत्रे' या सदरात 'भारताचे संकटमोचक' या शीर्षकाचा माझा एक लेख प्रकाशित झाला. त्याच दिवशी दहा वाजून बारा मिनिटांनी माझा भ्रमणध्वनी खणखणला. मी फोन घेतला आणि पुण्याचे डॉ. अशोक काळे सर माझ्याशी बोलत असल्याचे मला कळले. त्यांनी पुण्याच्या तरुण भारतात माझा लेख वाचल्याचे मला सांगितले. मी नागपूरकर असल्याचे त्यांना सांगताच त्यांनी 'लेख वाचला का ?' असा प्रश्न मला केला. तरुण भारतच्या नागपूर आवृत्तीत पण लेख असल्याचे मी सरांना कळवले. माझी लेखनशैली बघता मी वैद्यकीय डॉक्टर खात्रीने नसणार असा विश्वास त्यांना वाटत होता. पण मी विकृतिशास्त्रज्ञ आहे हे कळल्यावर त्यांना थोडसं आश्चर्य वाटलं. सेवानिवृत्तीनंतर करत असलेल्या समाजकार्याबद्दल त्यांनी मला विस्तृत माहिती दिली. त्यांच्या सामाजिक कार्याला हातभार लावण्याची मी तयारी दर्शवली. सहा मिनिटांच्या संवादात मला नवीन माहिती मिळाली. केवळ तरुण भारतमुळे मला पुण्यातील एक वरिष्ठ डॉक्टर मित्र मिळाला.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

### शतक पूर्तीनिमित्त अभिनंदन

आजपर्यंत वाचलेल्या अग्रलेखांपैकी अतिशय उत्तम आणि आदर्श अग्रलेख आज वाचण्यात आला. खूप खूप अभिनंदन. मी लहानपणापासूनच तरुण भारतमधील अग्रलेख, स्तंभलेख आणि रविवारची पुरवणी वाचूनच मोठे झाले. राजकारण, समाजकारण आणि अध्यात्म, राष्ट्रधर्म याविषयी आवड निर्माण झाली. घरात संघाचे संस्कार पूर्वीपासूनच होते. देव ,देश आणि धर्म यासाठी वाहिलेले हे एकमेव दैनिक होते. मा. गो. वैद्य हे संपादक असतानापासूनचे तरुण भारत मला माहिती आहे. प्रतिकूल परिस्थितीत, अडथळ्यांची शर्यत पार करत, एका विशिष्ट वैचारिक भूमिकेशी एकनिष्ठ राहून शतकपूर्ती करणे सोपे नाही. बऱ्यापैकी मी त्याची साक्षीदार आहे. १९९० पासून जागतिक आणि भारतातील बदल आणि त्यानंतर भारताची समृद्धीकडे होणारी वाटचाल ते २०१४ नंतर आपल्या विचारांशी सुसंगत सत्तांतर हे सर्व बदल आम्हाला अनुभवता आले. मला तरुण भारतमुळेच लिखाणाची आवड निर्माण झाली. तत्त्वाशी एकनिष्ठ राहून, कोणतीही आर्थिक तडजोड न करता शतकपूर्तीचा पल्ला गाठणे सोपे नव्हते. या अग्रलेखांमुळे आताच्या पिढीला तरुण भारतची वैचारिक, खडतर, कणखर आणि त्यातून प्रगतीकडे झालेली वाटचाल कशी झाली याची इत्थंभूत माहिती मिळाली. अभिनंदन आणि पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा.

**माधवी पत्की**/नागपूर

### वनक्षेत्राची घट अत्यंत चिंताजनक

जगातील वन क्षेत्र संरक्षित राहावे व जंगलातील संपूर्ण जीवजंतूंचे संरक्षण व्हावे या उद्देशाने २१ मार्चला आंतरराष्ट्रीय वन दिवस साजरा केला जातो. देशात फक्त २१ टक्के व राज्यात १६ टक्के वनक्षेत्र शिल्लक असल्याचा अहवाल अत्यंत गंभीर व धोकादायक बाब आहे. घटत्या वनक्षेत्रामुळे हवामानात बदल होऊन ग्लेशियर वितळणे, भूकंप, ज्वालामुखीचा उद्रेक, भूस्खलन, अति उष्णता, अति पाऊस, त्सुनामी, समुद्राची पातळी वाढणे अशा घटना वाढत आहेत. अमेरिकेच्या हेल्थ इफेक्ट इन्स्टिट्यूटने 'स्टेट ऑफ ग्लोबल एअर २०२४' अहवाल सादर केला आहे. वायुप्रदूषणामुळे जगभरातील मृत्यूच्या तुलनेत २५ टक्के मृत्यू भारतात होतात म्हणजेच भारत वायुप्रदूषणाच्या बाबतीत अग्रेसर असल्याचे दिसून येते आणि ही गंभीर बाब आहे याला रोखण्यासाठी वनक्षेत्र वाढविण्याची नितांत गरज आहे व संपूर्ण स्तरातून वृक्षलागवड मोहीम युद्धपातळीवर राबविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**रमेश कृष्णराव लांजेवार**/नागपूर,

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# कनकालेश्वर महोत्सव ही बीडची खरी ओळख : डॉ.योगेश क्षीरसागर

## संस्कार भारतीच्या तिसाव्या कंकालेश्वर महोत्सवाने नववर्षाचे स्वागत

तभा. वृत्तसेवा

**बीड** | गेली तीन दशके बीड जिल्ह्याची सांस्कृतिक ओळख सर्वदूर करणारा कनकालेश्वर महोत्सव ही बीडची खरी ओळख असून मोठे कलावंत देखील आम्ही या महोत्सवात कला सादर केल्याचे अभिमानाने सांगतात, आता हा महोत्सव अधिक व्यापक व्हावा असे प्रतिपादन युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

तीसावा कनकालेश्वर महोत्सव प्रतिवर्षाप्रमाणे कनकालेश्वर मंदिराच्या परिसरात आणि जलाशयातील तरंगत्या रंगमंचावर संपन्न झाला. या महोत्सवाचे उद्घाटन भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, भाजप युवा नेते डॉ. योगेश क्षीरसागर, संस्कार भारती देवगिरी प्रांताचे उपाध्यक्ष देवेंद्र कुलकर्णी यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले. त्यानंतर सौ वासवदत्ता हसेगावकर आणि प्रमोद वझे यांनी संस्कार भारती गीत सादर केले.तबल्यावर सार्थक वझे तर संवादीनी वर



महेश वाघमारे यांनी साथ दिली कार्यक्रमास यावेळी ज्येष्ठ नेते नवनाथ शिराळे संरक्षक भरत लोळगे, रंगकर्मी कुलदीप धुमाळे प्रसिद्धी प्रमुख महेश वाघमारे, गटनेत्या डॉ. सारिका क्षीरसागर नगरसेवक आदित्य माने नगरसेवक शुभम धूत, नगरसेवक गोविंद शिराळे शांतिनाथ डोरले यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

बीड जिल्हा हा कलाकारांचा जिल्हा आहे संस्कार भारती ने कंकालेश्वर महोत्सवाच्या माध्यमातून संस्कृती जोपासण्याचे काम केले आहे आम्ही संस्कार भारतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत असे मत यावेळी शंकर देशमुख यांनी व्यक्त केले तर डॉ. योगेश क्षीरसागर यांनी बोलताना हा कनकालेश्वर महोत्सव जागतिक पातळीवर पोहोचावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

# भालेराव नवोदय विद्यालय प्रवेशास पात्र



तभा. वृत्तसेवा

**केज दि २०(प्रतिनिधी)** | तालुक्यातील माळेगाव येथील जि प प्रा शाळेची विद्यार्थीनी संबोधी किशोर भालेराव ही जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा देऊन प्रवेशास पात्र ठरली आहे या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. या यशाबद्दल

अक्षर परिवाराचे विष्णू यादव, महादेव ढाकणे,विक्रम डोईफोडे,गीता अंडील, युवराज हिरवे, डॉ हनुमंत सौदागर,बिभीषण मोहिते,सतीश देशमुख,विनायक आवाड, अण्णा कदम,तुषार पाटील,दया खोपे,जयदीप देशमुख,प्रकाश कांबळे,प्रशांत कांबळे,एच के कांबळे,बाळासाहेब बचूटे, महादेव कांबळे, यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# केज येथे दोन दिवसीय प्रशिक्षण



तभा. वृत्तसेवा

केज दि २०(प्रतिनिधी)

केज शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती सभागृह येथे आधार उद्योजकता प्रशिक्षण केंद्र यांच्या वतीने केज येथे दोन दिवसीय प्रशिक्षण घेण्यात आले.

शेळीपालन ,कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय प्रशिक्षण संपन्न,या प्रशिक्षणामध्ये शेळ्यांचे आजार, उपचार लषिकरण,चारा व्यवस्थापन शेड व्यवस्थापन, तसेच शासनाच्या वेगवेगळ्या योजना, त्यासाठी लागणारी कागदपत्रे प्रोजेक्ट रिपोर्ट नमुना शासकीय योजनांची किट अनुभव प्रमाणपत्र, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी देण्यात आले यामध्ये आधार उद्योजकता प्रशिक्षण केंद्राचे मुख्याधिकारी राजेंद्र कांबळे,प्रकल्प अधिकारी निलेश मोटे, डॉ गणेश गवळी, तज्ञ प्रशिक्षक जयंत कांबळीकर आदींची उपस्थिती होती

पशुसंवर्धन प्रशिक्षणासाठी

पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ थळकरी यांनी मार्गदर्शन केले.प्रशिक्षणात तालुकाभरातून शेतकरी,युवक यांनी प्रशिक्षण पूर्ण केले.

# आवसगाव येथून ध्वज दिंडीचे शिखर शिंगणापूरकडे प्रस्थान

**बीड** | चैत्रवारी निमित्त आवसगाव (ता. केज) येथून मानाच्या ध्वजाची पायी ध्वजदिंडीने शिखर शिंगणापूरकडे भक्तिभावात प्रस्थान केले. अनेक वर्षांची ही धार्मिक परंपरा असून यंदाही लहान-थोर, महिला-पुरुष भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. कै. संभाजी महाराज ध्वजकरी यांनी सुरू केलेली ही पायी ध्वजदिंडी असून त्यांच्या पश्चात धर्मराज महाराज ताठे हे सेवेकरी म्हणून कार्य पाहत आहेत. तर महादेव शिनगारे, सुधाकर शेळके व अशोक शिंदे यांनी नियोजनाची जबाबदारी सांभाळली आहे. यात्रेदरम्यान भाविक 'हर हर महादेव, शंभो पार्वती पते, शिव हर हर महादेव' अशा जयघोषात तसेच ढोल-ताशांच्या निनादात शिखर शिंगणापूरकडे प्रस्थान करत आहेत.

# शुभमुहूर्तावर 'स्वरांजली संगीत विद्यालय'चे जल्लोषात उद्घाटन

तभा. वृत्तसेवा

**केज प्रतिनिधी** |

केज शहरात गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर दि. १९ रोजी 'स्वरांजली संगीत विद्यालय'चा उद्घाटन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात पार पडला. सांस्कृतिक जाणीवा जपणाऱ्या या नव्या उपक्रमामुळे केज परिसरात संगीत शिक्षणाला नवे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी केज नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सौ. सीता ताई बनसोड या होत्या. त्यांच्या हस्ते विधिवत रिबीन कापून विद्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते हरुण भाई इनामदार यांची उपस्थिती कार्यक्रमाला लाभली.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या



महिला तालुका अध्यक्षा सौ. शितलताई लांडगे, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा सौ. राधाताई सपकाळ, ज्येष्ठ पत्रकार व समाजसेवक प्रा. हनुमंत भोसले, एमएससीबीचे अधिकारी विष्णू तेलंग तसेच पी.एस.आय. लांडगे साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.

कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते तसेच पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्येष्ठ पत्रकार धनंजय कुलकर्णी, चंद्रकांत पाटील,पुण्यनगरीचे अभय जोशी, रंजीत घाडगे, विजय बिक्कड, अशोक सोनवणे, प्रदीप गायकवाड, पांडुरंग कसबे, अनिल ठोंबरे, संजीवन कोरडे यांच्यासह अनेक पत्रकारांनी या सोहळ्याला उपस्थित राहून कार्यक्रमाला गौरव प्राप्त करून दिला.

याशिवाय कला-क्रीडा विश्व समितीचे पदाधिकारी व सदस्य, तसेच परिसरातील नागरिकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. स्थानिक नागरिकांची उपस्थिती या उपक्रमाबद्दल असलेली उत्सुकता आणि प्रेम दर्शवत होती. कार्यक्रमाची सुरुवात प्रास्ताविकाने झाली.

# झालेल्या नुकसानीच्या पाहणीसाठी संदीप क्षीरसागर थेट बांधावर

## शेतकऱ्यांना आधार देत भरपाई मिळवून देण्याचे दिले आश्वासन



तभा. वृत्तसेवा

**बीड दि.२० (प्रतिनिधी)** | जिल्ह्यात अनेक ठिकाणी मागील दोन दिवसांपासून गारांसह अवकाळी पाऊस पडत आहे. यामुळे काढणीला आलेल्या गहू, ज्वारी सह इतर पिकांचे आणि फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे आ. संदीप क्षीरसागर यांनी शुक्रवारी (दि.२०) रोजी प्रशासनाला घेऊन प्रत्यक्ष बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली आणि प्रशासनाला पंचनामे करण्याचे निर्देश दिले. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वस्त केले.

वेधशाळेने मागील काही दिवसांपूर्वीच अवकाळी पाऊस व गारपीटीचा अंदाज वर्तवला होता. त्या अंदाजानुसार मागील दोन दिवसांपासून बीड जिल्ह्यात अनेक भागांमध्ये अवकाळी पाऊस आणि गारपीट सुरू आहे. यानंतर गुरुवारी (दि. १९) दुपारी बीड तालुक्यातील लिंबागणेश, पिंपळनेर परिसरासह बीड मतदारसंघातील वेगवेगळ्या भागात जोरदार पाऊस झाला. या पाऊस आणि गारपीटीने हाताशी आलेले गहू, ज्वारी, हरभरा यासह रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच अंबा, टरबूज, खरबूज, चिकू आदी फळबांगाचे मोठे नुकसान झाले आहे. मोठ्या प्रमाणात गारपीट झाल्याने लिंबागणेश (ता. बीड) येथील शेतकरी दादासाहेब खिल्लारे यांचा टरबूजाचा पूर्ण प्लॉटचे नुकसान झाले आहे. गारपीटीने मार लागून काही फळे फुटली तर अनेक फळे मार लागून खराब झाली आहेत. असेच नुकसान अनेक ठिकाणी टरबूज आणि खरबूज लागवड केलेल्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. या नुक्सानीची माहिती मिळताच आ. संदीप क्षीरसागर यांनी आज शुक्रवारी (दि.२०) सकाळीच धाव घेत चक्क बांधावर जाऊन आ. संदीप क्षीरसागर यांनी लिंबागणेश, पोखरी, पिंपरनई येथे भेट देऊन नुकसानीची पाहणी केली. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा दिला .

# बीडच्या बाजीबाबा देवस्थानने उभारले अखंड अन्नछत्र

तभा. वृत्तसेवा

**बीड** | पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील प्रसिद्ध बाजीबाबा देवस्थान येथे अखंड अन्नछत्र उभारण्यात आले आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विश्वासू कार्यासन अधिकारी कृष्णा जाधव यांच्या संकल्पनेमधून अन्नछत्र सुरू करण्यात आले.

गृह विभागाचे उपसचिव रवींद्र औटे यांच्या उपस्थितीमध्ये ह.भ.प काका महाराज बोधले यांच्या हस्ते अन्नछत्र उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. दासखेड येथील बाजीबाबा देवस्थान राज्यांमध्ये प्रसिद्ध आहे. कृष्णा जाधव यांच्या संकल्पनेमधून मंदिराच्या

जिर्णोदराचे काम सुरू आहे. सोबतच देवस्थानावर येणाऱ्या भाविकांना प्रसादरुपी जेवण मिळावे या संकल्पनेमधून अन्नछत्र सुरू करण्यात आले आहे.

गृह विभागाचे उपसचिव रवींद्र औटे यांच्या उपस्थितीत ह.भ.प काका महाराज बोधले यांच्या हस्ते अन्नछत्राचा शुभारंभकरण्यात आला. यावेळी राणोजी ठोंबरे, माने, शिंदे, चव्हाण, पारगावचे सरपंच पद्माकर घुमरे, पाचंग्रीचे सरपंच गणेश मुंडे, भाऊसाहेब भराटे, मधुकर कोकाटे, केशव रसाळ, गणेश कोकाटे आदी उपस्थित होते. अन्नछत्रासाठी माळेवाडीचे ग्रामस्थ, अशोक कोकाटे, युवराज कोकाटे यांनी धान्य दिले. गणेश कोकाटे यांनी हयात भर मीठ पुरवण्याचा संकल्प जाहीर केला. तालुक्यात अखंड अन्नछत्र सुरू करणारे बाजीबाबा देवस्थान एकमेव आहे.

# नगरपंचायत मध्ये 2015 ते 2026 काळत कोट्यवधींचा भ्रष्टाचार उच्चस्तरीय चौकशी समिती नेमा शेकापची मागणी

तभा. वृत्तसेवा

**केज** | नगरपंचायतीतील २०१५ ते २०२६ या कालावधीत विविध विकास कामांमध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप करत थेट राज्याचे मुख्य सचिव व नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे दिलेल्या निवेदनात शेतकरी कामगार पक्षाचे राज्य चिटणीस मंडळ सदस्य भाई मोहन गुंड म्हटले आहे. नगरपंचायतीमध्ये रस्ते, नाल्या, सभागृह या सारखीच कामे वेगवेगळ्या योजनेतून वेगवेगळ्या नावाखाली पुन्हा पुन्हा निधी उचलल्याचे आरोप करण्यात आले आहेत. जनरल निधी आणि विकास कामांवरील खर्च यामध्ये ताळमेळ नसल्याचे ही निवेदनात नमूद करण्यात



मुख्य सचिव व नगरविकास प्रधान सचिवांना निवेदन

समिती नेमली तर आजुन गैरव्यवहार उघड येतील.

- भाई मोहन गुंड

आले आहे.

रस्त्याचे ठिकाण बदलून इतर ठिकाणी अनेक शहरांमध्ये रस्ते पुढाऱ्यांच्या वस्तीमध्ये सुईप्रमाणे नियमाबाह्य करण्यात आले आहेत,

शहरातील नागरिकांना घरकुलासाठी कागदपत्र गोळा करायला लावली आणि त्यांना नगरपंचायत चा कर भरायला लावला अजून त्यांना घरकुल नाही तर काही घरकुलधारकांचे घरकुल तयार झाले मात्र त्यांना पहिलाही हप्ता मिळालेला नाही. सन २०१८-१९ मधील पंतप्रधान आवास योजनेत पात्र लाभार्थ्यांच्या हक्काचे सुमारे ३ कोटी ६२ लाख रुपये अपहार झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात सध्या चौकशी सुरू असली तरी संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून अपहाराची रक्कम परत मिळवावी लाभार्थ्यांना हक्काची घरे द्यावी अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. घरकुल घोटाळ्यात सहभागी असलेले अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदार यांच्यावर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करावी, दलित वस्ती सुधार योजनेतील निधी गायब झाला आहे.

# धुमेगाव येथे शताब्दी महोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन

तभा. वृत्तसेवा

**गेवराई** | तालुक्यातील धुमेगाव येथे शताब्दी महोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन मोठ्या भक्तीभावाने करण्यात आले आहे. दरम्यान या अखंड हरिनाम सप्ताहात रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांच्या वाणीतून रामकथेचे निरूपण केले जाणार आहे.

या सप्ताहात दररोज पहाटे काकडा आरती, हरिनामाचा गजर, तसेच ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण सुरू राहणार आहे. सायंकाळी हरिपाठ, कीर्तन व प्रवचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असून याची सुरुवात दि २६ मार्च ते दि २ एप्रिलपर्यंत आयोजन केले आहे. दि. २६ चैतन्य महाराज देगलुरकर, दि. २७ विशाल महाराज खोले, दि. २८ रोजी शिवाजी महाराज

नारायणगड, दि. २९ उमेश महाराज दशरथे, दि. ३० रोजी प्रकाश महाराज जवंजाळ, दि. ३० ज्ञानसिंधु संदिपान महाराज हसेगावकर, दि. ३१ रोजी पांडूरंग महाराज घुले, दि. २ एप्रिल रोजी सकाळी ११ते १ या वेळेत महंत स्वामी जनार्दन गुरु स्वामी निगमानंद महाराज क्षेत्र मस्येंद्रगड संस्थान यांचे काल्याचे कीर्तन व नंतर महाप्रसाद होईल. गावातील ग्रामस्थ, तरुण मंडळे व महिला मंडळ यांच्या सहकार्याने हा धार्मिक सोहळा उत्साहात पार पडणार आहे. या धार्मिक सोहळ्यास भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.

# डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांना ' रिसर्च प्रोजेक्ट' मंजूर आयसीएसएसआर'कडून मिळणार 6 लाखांचा निधी

## स्वा. सावरकरांच्या साहित्य आणि समाजकार्यावर संशोधन करणार

तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी) दि. २०** | येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांना 'आयसीएसएसआर' (शिक्षा मंत्रालय भारत सरकार ) यांच्या वतीने ६ लाखांचा ' रिसर्च प्रोजेक्ट' मंजूर करण्यात आला आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या साहित्याचा आणि समाजकार्याचा अभ्यास आणी संशोधन या प्रकल्प माध्यमातून करण्यात येणार आहे. 'इंडियन कॉन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च' यांच्यावतीने डिसेंबर २०२५ मध्ये मेजर / मायनर रसिर्च प्रोजेक्टसाठी प्रस्ताव



मागविण्यात आले. 'मायनर रिसर्च प्रोजेक्ट'साठी डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी प्रस्ताव सादर केला. ' आ य सी ए स ए स आ र ' च्या वतीने १५ मार्च रोजी प्रकल्प मंजूरीची यादी जाहीर करण्यात आली आहे. डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी सादर केलेला "स्वातंत्र्यवीर सावरकर : ए लिटररी लुिमिनरी अँड टायटन ऑफ द सोशल रिफॉर्म्स " हा प्रकल्प मंजूर करण्यात आला. या प्रकल्पाचा कालावधी १ वर्षांचा असून यामध्ये ६ लाखांचा निधी मिळणार आहे. डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर हे सावरकर साहित्याचे अभ्यासक असून त्यांनी आजपर्यंत मागील २५ वर्षात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे जीवन कार्य, साहित्य, सामाजिक कार्य, राजकीय प्रवास,भाषाशुद्धी लिपी सुधारणा, वैज्ञानिक दृष्टिकोन, या विषयावर एक हजारापेक्षा जास्त व्याख्याने महाराष्ट्र आणि महाराष्ट्राच्या बाहेर दिलेली आहेत. 'हर घर सावरकर' उपक्रमातही ते सक्रिय सहभागी आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवन कार्य आणि साहित्याचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी ते गेले अनेक वर्षापासून सक्रिय आहेत.

# कडक उन्हात महिलांची उन्हाळी कामांसाठी लगबग, कुरड्या, पापड, शेवया, सांडगे घालण्यात दिवस

तभा. वृत्तसेवा

**बीड** | ग्रामीण भागात मार्च एप्रिल-मे महिन्यात पारंपरिक पद्धतीने केली जाणारी उन्हाळी कामे सध्या जोरात सुरू झाली आहेत. यंदा मार्च महिन्यापासूनच उन्हाचा तडाखा वाढल्याने महिलांनी उन्हाळी पदार्थ तयार करण्याची लगबग लवकरच सुरू केली असून गावागावांत कुरड्या, पापड, शेवया, सांडगे, चिप्स यासारख्या पदार्थांची तयारी सुरू असल्याचे चित्र दिसत आहे.

ग्रामीण भागातील महिलांसाठी उन्हाळा म्हणजे वर्षभरासाठी लागणाऱ्या सुक्या पदार्थांची तयारी करण्याचा महत्त्वाचा काळ मानला जातो. सण-उत्सव तसेच रोजच्या जेवणात लागणारे पापड, कुरड्या, ज्वारी-बाजरी व तांदळाच्या पापड्या, गव्हाच्या व रव्याच्या शेवया, खारवड्या, बटाट्याचे चिप्स, सांडगे आदी पदार्थ या काळात मोठ्या प्रमाणावर तयार करून साठवले जातात. त्यामुळे गावोगावी घरांच्या अंगणात, ओसरीवर किंवा मोकळ्या जागेत उन्हात सुकवलेल्या पापड-कुरड्यांच्या रांगाच दिसून येतात. या कामासाठी भरपूर उन्हाची आवश्यकता असल्याने महिलांना

कडक उन्हाचा सामना करत दिवसभर मेहनत घ्यावी लागते. सकाळी लवकर उठून धान्य धुणे, दळणे, पीठ तयार करणे, चिक (मिश्रण) शिजवणे, पापड लाटणे किंवा कुरड्या टाकणे अशी कामे महिलांकडून केली जातात. त्यानंतर तयार केलेले पदार्थ उन्हात वाळवण्याचे काम केले जाते. या प्रक्रियेत घरातील लहान मुले-मुलीही महिलांना मदत

गॅसवर हे पदार्थ तयार करणे महागात तर पडत आहेच सध्या गॅस मिळत नसल्याने ग्रामीण भागात महिलांनी चुलीला प्राधान्य दिले आहे. पहाटेपासूनच अंगणात चुली पेटवून मोठ्या भांड्यात मिश्रण शिजवण्याचे काम सुरू होते.

# कांद्याचे भाव घसरल्याने शेतकरी चिंतेत

तभा. वृत्तसेवा

**बीड** | परिसरात सध्या उन्हाळी कांद्याची काढणी मोठ्या प्रमाणात सुरू झाली असून, शेतकरी शेतात काढणीच्या कामात व्यस्त आहेत. मात्र, बाजारात कांद्याचे भाव घसरल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. कांद्याचे बाजार भाव एकीकडे पडले, तर कांदा काढण्यासाठी लागणाऱ्या मजुरांचे दर मात्र आकाशाला भिडले आहेत. एका जोडीला हजार रुपये मोजावे लागत आहेत.

नाथापुर, जवळा, नाळवंडी, बेलवाडी, बाभुळवाडी, सांडरवन, पिंपळगाव, ईट, घाटसावळी परिसरात सध्या कांदा काढणी सुरू झाली आहे. या भागांत मोठ्या प्रमाणात कांद्याची लागवड झाली होती. हवामान अनुकूल राहिल्याने उत्पादन चांगले झाले आहे. मात्र, सध्या बाजारात कांद्याला प्रतिक्विंटल सुमारे ८०० ते १२०० रुपये दर मिळत आहे.

कांदा काढणीसाठी मजुरांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते. सध्या तालुक्यात मजुरांना दररोज सुमारे ४०० ते ५०० रुपये मजुरी द्यावी लागत असल्याचे शेतकरी सांगतात. काही ठिकाणी कामाच्या प्रमाणानुसार पोते भरणे किंवा कांदा गोळा करण्याच्या हिशेबानेही मजुरी दिली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च आणखी वाढला आहे. कांद्याचे उत्पादन चांगले आले आहे, पण बाजारभाव खूपच कमी आहेत. खत, औषधे, मजुरी आणि वाहतूक खर्च वाढला आहे. या दरात कांदा विकल्यास खर्चही निघणे कठीण आहे.

# माजलगावात सैलानी बाबा संदल पालकी व यात्रा उरुसचे आयोजन

**माजलगाव प्रतिनिधी** | दि.२२ शहराजवळील असलेल्या ढोरगाव-हिंगणवाडी शिवारात सैलानी बाबा यांचे दर्गा परिसर येथे दि.२२ मार्च रविवार रोजी सैलानी बाबा संदल व यात्रा उरूसचे आयोजन करण्यात आले आहे. याचा लाभ भक्तांनी घ्यावा असे आवाहन यात्रा महोत्सव समितीचे अध्यक्ष विशाल गायकवाड यांनी केले आहे. या दर्ग्याच्या दर्शनासाठी जिल्हा व राज्यभरातून विविध जाती धर्मातील भाविकांची मोठी उपस्थिती दरवर्षी असते. सकाळी ९ ते सायंकाळी १० वाजेपर्यंत भाविक भक्तांचि दर्शनासाठी आलोट गर्दी पाहायला मिळते.

# अंबिका नगर भागात चोरट्यांनी दोन घरे फोडून लाखोंचा ऐवज केला लंपास

## ३० ते ३५ तोळे सोन्याचांदीचे दागिने, रोख रक्कम पळविली



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ मार्च**

शहरातील अंबिका नगर भागात चोरट्यांनी एका डॉक्टरच्या घरासह सेवानिवृत्त बँक अधिकाऱ्याचे घर फोडून लाखोंचा ऐवज लंपास केल्याची घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली आहे. हिंगोली शहर पोलिस ठाण्याच्या पथकासह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी भेट दिली आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज पाहणी करीत आरोपींचा शोध सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शहरातील अंबिका नगर भागात डॉ विकास देवकर यांचे घर आहे. त्यांच्या वरच्या मजल्यावर सेवानिवृत्त बँक अधिकारी दिलीप देशमुख यांचे घर आहे. देशमुख कुटुंबिय बाहेरगावी गेले होते. तर दोन दिवसांपूर्वीच डॉ देवकर हे मुलाच्या उपचारासाठी कुटुंबियांसह मुंबई येथे गेले होते. घराला कुलूप असल्याचा गैरफायदा घेत चोरट्यांनी घरातील साहित्याची नासधूस केली. त्यानंतर चोरट्यांनी देशमुख यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यांच्या घरातील दागिने व रोख रक्कम चोरट्यांनी पळविली.

शनिवारी सकाळी डॉ देवकर यांचा पूतण्या घराजवळ आला असतांना त्याला घराच्या दरवाजाचे कुलूप व कोंडा तुटलेला दिसून आला. त्याने तातडीने सदर प्रकार त्यांच्या कुटुंबियांना सांगितला. त्यानंतर या घटनेची माहीती शहर पोलिसांना देण्यात आली. पोलिस निरीक्षक संदीप मोदे यांच्यासह संजय मार्के, अशोक धामणे, शंकर ठोंबरे यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या पथकानेही पाहणी केली. पोलिसांनी ठसे तज्ज्ञांना पाचारण केले असून त्यांनी घटनास्थळावरून ठसे घेतले आहेत. याशिवाय श्वान पथकही पाचारण करण्यात आले होते. मात्र श्वान पथक चोरट्यांचा माग काढू शकले नाही. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी सुरू केली असून दोन्ही घटनेत ३० ते ३५ तोळे सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम लंपास केल्याचा अंदाज व्यक्त होत आहे.

# नवनिर्वाचित पोलिस पाटील यांचा आ. मुटकुळेंकडून सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ मार्च**

हिंगोली विधानसभा मतदारसंघातील नवनिर्वाचित पोलीस पाटलांचा गौरव करण्यासाठी आज एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक आमदार तानाजीराव मुटकुळे यांच्या निवासस्थानी हा सत्कार सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. यावेळी नवनिर्वाचित पोलीस पाटलांना त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देत मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी भाजपचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार गजाननराव घुगे, ज्येष्ठ नेते फुलाजी शिंदे, संतोष टेकाळे, तालुका अध्यक्ष माणिकराव लोंढे, एडवोकेट अमोल जाधव यांच्यासह भाजपचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शासकीय प्रक्रियेतून निवड झालेल्या आणि गावाच्या संरक्षणाची तसेच प्रशासकीय दुव्याची जबाबदारी स्वीकारलेल्या नवनिर्वाचित पोलीस पाटलांचा यावेळी पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने पिराजी चिंतारे,.जगन्नाथ गडदे, विष्णू गडदे, गणेश तनपुरे, विद्या कोहळे, गायत्री जिरवणकर, अरुण मालोदे, आकाश डांगे, राम मोरे यांच्यासह मतदारसंघातील अनेक नवनिर्वाचित पोलीस पाटील या सोहळ्याला उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार तानाजीराव मुटकुळे म्हणाले की, पोलीस पाटील हे प्रशासन आणि जनता यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहेत. गावातील शांतता व सुव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी नवनिर्वाचित पोलीस पाटलांनी निष्ठेने काम करावे. तसेच जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनीही सर्व नवनिर्वाचित उमेदवारांचे अभिनंदन करून त्यांना गावपातळीवरील कामासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व पोलीस पाटलांनी आमदारांचे आभार मानले. या सोहळ्यामुळे नवनिर्वाचित पोलीस पाटलांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

# राजस्थानी मारवाडी महिलांनी केला गणगौर उत्सव साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ मार्च**

मारवाडी संस्कृतीतील अत्यंत महत्त्वाचा आणि महिलांच्या जिव्हाळ्याचा सण मानला जाणारा 'गणगौर' उत्सव हिंगोली शहरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. होळीच्या दुसऱ्या दिवसापासून सुरू झालेल्या या उत्सवाचा मुख्य सोहळा राजस्थानी मारवाडी महिला मंडळाच्या वतीने भक्तीमय वातावरणात पार पडला. यावेळी शहरातील विविध भागांतील राजस्थानी महिलांनी पारंपरिक वेशभूषेत एकत्र येत शिव-पार्वतीचे पूजन केले.

होळीनंतर तब्बल १६ दिवस चालणाऱ्या या उत्सवात महिला आणि कुमारिका 'गवर' (माता पार्वती) आणि 'ईसर' (भगवान शिव) यांची मनोभावे पूजा करतात. हिंगोलीतील मारवाडी समाजात या सणाचे विशेष महत्त्व असून, महिला मंडळाच्या वतीने सामूहिक पूजन आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अखंड सौभाग्य आणि पतीच्या दीर्घायुष्यासाठी सुवासिनींनी, तर इच्छित वर प्राप्तीसाठी कुमारिकांनी हे व्रत मोठ्या श्रद्धेने केले.

उत्सवाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात महिलांनी पारंपरिक 'राजस्थानी पोषाख' परिधान करून गणगौरीची गीते गायली. विशेषतः गोर ए गणगौर माता खोल किवाडा. सारख्या पारंपरिक गीतांवर महिलांनी ठेका धरला. कार्यक्रमात 'घुमर' नृत्याचे सादरीकरण करण्यात आले, ज्यामुळे राजस्थानी संस्कृतीचा वारसा हिंगोली शहरात पुन्हा एकदा अधोरेखित झाला.



**हिंगोली– मुस्लीम बांधवांचा पवित्र सण रमजान ईद निमित्त येथील औंढा रोडवर कडक पोलिस बंदोबस्त लावला होता. यावेळी पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांनी स्वत: घटनास्थळी हजर राहून पाहणी केली. यावेळी पोलिस अधिकारी व कर्मचारी दिसत आहेत. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### हुतात्मा दिनानिमित्त पदयात्रांचे आयोजन

हिंगोली– हुतात्मा दिनाचे औचित्य साधून 'माय भारत' संस्थेतर्फे देशभरातील सर्व जिल्ह्यांमध्ये 'हुतात्मा दिवस पदयात्रा'चे आयोजन करण्यात आले आहे. भगतसिंग, शिवराम राजगुरू आणि सुखदेव या स्वातंत्र्यसैनिकांच्या सर्वोच्च बलिदानाला अभिवादन करण्यासाठी ही पदयात्रा काढण्यात येणार आहे. 'माझा भारत, माझी जबाबदारी' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमाचा मुख्य उद्देश युवकांमध्ये राष्ट्रनिर्मितीची भावना जागृत करणे, तसेच नागरी जबाबदारी आणि सामुदायिक विकासासाठी त्यांचा सक्रिय सहभाग वाढविणे हा आहे. या पदयात्रेत प्रत्येक जिल्ह्यात किमान ५०० युवा स्वयंसेवकांचा सहभाग अपेक्षित असून, युवक एकता, शिस्त आणि देशभक्तीचा संदेश देतील. पदयात्रेपूर्वी १९ मार्चपासून 'माय भारत' पोर्टलवर 'अनसंग हिरोज' या विषयावर ऑनलाईन प्रश्नमंजुषा आणि एक युवा ऐसा भी या विषयावरील स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. २२ मार्च रोजी स्वच्छता मोहीम व रस्ते सुरक्षा जनजागृती यांसारख्या उपक्रमांद्वारे 'सिव्हीक सेन्स चॅलेंज' राबविण्यात येत आहे. पदयात्रेची सुरुवात हुतात्म्यांना पुष्पहार अर्पण करून व त्यांच्या स्मृतींना उजाळा देणाऱ्या अभिवादन सभेने होणार आहे. ही पदयात्रा अंदाजे २ ते ४ किलोमीटर अंतराची असून शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात येईल. सहभागी युवक हातात तिरंगा, डोक्यावर टोपी आणि राष्ट्रनिर्मितीसाठी युवक तसेच स्वातंत्र्याचा आदर करा, जबाबदारीने वागा अशा संदेशांचे फलक घेऊन सहभागी होतील.

### नवोदय विद्यालयात निवड विद्यार्थ्यांचा सत्कार



हिंगोली– नुकत्याच पार पडलेल्या जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत हिंगोली जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांनी दैदिप्यमान यश संपादन केले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकण्यासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यासाठी शनिवारी हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांच्या निवासस्थानी विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा आमदार मुटकुळे यांनी पुष्पहार व भेटवस्तू देऊन गौरव केला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीत मिळवलेले हे यश कौतुकास्पद असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. या सत्कार समार प्रसंगी जिल्ह्यातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. यामध्ये प्रामुख्याने भाजपचे पदाधिकारी, शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ आणि यशस्वी विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आ. मुटकुळे यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

# राम-कृष्ण यांच्या जीवनातून संघर्षाचा मंत्र मिळतो- प.पू. रमेशभाई ओझा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ मार्च**

येथे सुरू असलेल्या श्रीमद भागवत कथेत आंतरराष्ट्रीय कथाकार प.पू. रमेश भाई ओझा यांनी भाविकांना जीवनाचा मोलाचा संदेश देत, भागवत कथा श्रवण केल्यानंतर मानवाचे जीवन पवित्र होते, असा कानमंत्र दिला. त्यांच्या ओजस्वी वाणीने शुक्रवारी कथा मंडप भक्तिरसाने ओतप्रोत भरून गेला. नित्य कथेचा हा दुसरा दिवस होता.

येथील रामलीला मैदानावर, १९ ते २५ मार्च दरम्यान दुपारी चार ते सायंकाळी साडे सात यावेळेत श्रीमद भागवत कथेचे आयोजन गजराज बाल गणेश मंडळाच्या वतीने करण्यात आले असून, हिंगोलीत पहिल्यांदाच भाई ओझा यांचा मधुर वाणीतून भागवत कथा होत आहे. यावेळी त्यांनी अनेक दाखले देत भागवत कथा मानवाच्या जीवनात काय परिवर्तन घडवून आणते यांचे स्पष्टीकरण दिले. शुक्रवारी दुसऱ्या दिवशी भावीकाकांची गर्दी दिसून आली.

कथेदरम्यान रमेशभाई ओझा म्हणाले, रामायण व महाभारतातील उदाहरणे देत सांगितले की, भगवान श्रीराम आणि भगवान श्रीकृष्ण यांसारख्या अवतारांनाही जीवनात अनेक दुःख व संकटांचा सामना करावा लागला. त्यामुळे सामान्य माणसाच्या आयुष्यात येणाऱ्या अडचणींचे फारसे मोल नाही, तर त्यातून मार्ग काढण्याची शिकवण महत्त्वाची आहे.

भगवान श्रीरामांनी आपल्याला संकटांशी लढण्याची प्रेरणा दिली, तर भगवान श्रीकृष्णांनी जीवनातील संघर्षात कसे झुंजायचे, याचे तत्त्वज्ञान दिले, असे सांगत त्यांनी दोन्ही अवतारांच्या जीवनातील गूढ अर्थ उलगडला. रामकथा केवळ ऐकण्यासाठी नसून, श्रीरामांच्या आदर्श मार्गावर चालण्याचा संदेश देते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भागवत कथेचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, भागवत कथा हीच सर्वोत्तम साधना आहे. यावेळी केशवा माधवा, तुझ्या नामात रे गोडवा हे भक्तिमय गीत सादर करण्यात आले, यावेळी भावीक भक्तिमय वातावरणात लिन झाल्याचे दिसून आले.

कथेच्या माध्यमातून त्यांनी एक विचारप्रवर्तक प्रश्न उपस्थित केला ' भागवत आणि रामकथेचे आयोजन आपण का करतो? त्यामागचे खरे प्रयोजन काय आहे? यावर त्यांनी उत्तर देताना सांगितले की, केवळ परंपरा म्हणून नव्हे, तर आत्मपरिवर्तनासाठी कथा ऐकणे आवश्यक आहे.

याचवेळी बुद्धू मत बनो, बुद्ध बनो असा संदेश देत त्यांनी उपस्थितांना सजगतेचा मार्ग दाखवला. मै तो प्रेम की बात है पूछो या गाण्यावर भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कथा मंडपात नृत्य सादर केले, आणि संपूर्ण परिसर भक्तिरसात रंगून गेला. एकूणच, या भागवत कथेमुळे उपस्थित भाविकांना अध्यात्म, संघर्ष आणि प्रेम यांचा अनमोल संगम अनुभवायला मिळाला. यावेळी कथा मंडप खचाखच भरल्याचे दिसून आले. भाविकांना बसण्यासाठी उत्तम आसन व्यवस्था करण्यात आली आहे. यावेळी गजराज बाल गणेश मंडळाच्या पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

शहरातील रामलीला मैदानावर सुरू असलेल्या श्रीमद भागवत कथेला मोठी गर्दी होत असून भाविकांच्या सेवेसाठी श्री गजराज मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. भागवत कथा ऐकण्यासाठी हिंगोली जिल्ह्यासह परजिल्ह्यातूनही मोठ्या संख्येने हिंगोली शहरात दाखल होत आहेत.

# हिंगोली बस स्थानकात सवलतीच्या पाससाठी ज्येष्ठ नागरिकांची गर्दी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ मार्च**

राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध सवलत योजनांमुळे सध्या एसटी महामंडळाच्या बस प्रवासाकडे सर्वसामान्यांचा ओढा वाढला आहे. विशेषतः महिला आणि ज्येष्ठ पुरुषांसाठी असलेल्या 'अर्ध तिकीट' योजनेचा लाभ घेण्यासाठी हिंगोली शहरातील मुख्य बस स्थानकावर प्रवाशांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. सवलतीचे पास काढण्यासाठी आणि नूतनीकरण करण्यासाठी सकाळपासूनच खिडकीवर रांगा लागत आहेत.

एसटी महामंडळाच्या वतीने ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना मोफत प्रवास आणि ६५ ते ७५ वयोगटातील नागरिकांना तसेच सर्व महिलांना तिकीट दरात ५० टक्के सवलत दिली जात आहे. शासनाच्या या निर्णयामुळे ग्रामीण भागातून शहरात येणाऱ्या वृद्ध पुरुष आणि महिलांची संख्या लक्षणीय वाढली आहे. ही सवलत मिळवण्यासाठी आवश्यक असलेले 'स्मार्ट कार्ड' किंवा पास काढण्यासाठी हिंगोली आगाराच्या पास केंद्रावर सध्या प्रचंड गर्दी होत आहे.

बसस्थानकावरील पास खिडकीवर ज्येष्ठ नागरिक कागदपत्रे घेऊन रांगेत उभे असल्याचे चित्र गेल्या काही दिवसांपासून दिसत आहे. उन्हाचा चटका वाढत असतानाही, सवलतीचा लाभ मिळावा या उद्देशाने अनेक वृद्ध नागरिक लांबून बस स्थानकावर येत आहेत. प्रवाशांची वाढती संख्या पाहता, प्रशासनाकडून ही प्रक्रिया अधिक गतीने राबवावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# हिंगोलीत रमजान ईद उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ मार्च**

पवित्र रमजान महिन्याची सांगता आज मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात झाली. हिंगोली शहरातील औंढा रोडवर असलेल्या मुख्य ईदगाह मैदानावर शनिवारी सकाळी हजारो मुस्लीम बांधवांनी एकत्र येत रमजान ईदची विशेष नमाज अदा केली. यावेळी शहरात शांतता आणि सलोख्याचे वातावरण दिसून आले.

रमजानच्या महिनाभर चाललेल्या उपवासानंतर (रोझा) आज ईद-उल-फित्रनिमित्त मुस्लीम बांधवांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. औंढा रोडवरील ईदगाह मैदानावर सकाळपासूनच बांधवांची गर्दी सुरू झाली होती. उपस्थित मौलानांच्या मार्गदर्शनाखाली सामूहिक नमाज अदा करण्यात आली. यावेळी देशात शांतता, समृद्धी आणि बंधुभाव टिकून राहावा, यासाठी विशेष प्रार्थना (दुआ) करण्यात आली. नमाजनंतर एकमेकांना गळाभेट देऊन ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

ईदच्या या पवित्र मुहूर्तावर मुस्लीम बांधवांना शुभेच्छा देण्यासाठी शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी ईदगाह मैदानावर उपस्थिती लावली होती. यावेळी माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, न प चे गटनेते श्रीराम बांगर, उपनगराध्यक्ष माबुद बागवान, मधुकर मांजरमकर यांच्यासह नगरपालिकेचे स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, तसेच गणेश बांगर, खली बांगर, सुमित कांबळे, अबेदाली जहागीरदार आणि नगरपालिकेचे अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी मुस्लीम समाजातील वयोवृद्ध आणि तरुणांना शुभेच्छा देऊन सामाजिक ऐक्याचा संदेश दिला.

ईदच्या पार्श्वभूमीवर शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि वाहतुकीची कोंडी होऊ नये, यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली ईदगाह मैदान आणि परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## भोकर मध्ये तहसीलच्या पथकाची धाड

# व्यावसायीकांकडून दहा घरगूती गॅस सिलेंडर जप्त

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. २१ मार्च-**

घरगूती गॅसचा अवैध वापर रोखण्यासाठी तहसीलदार गूंडमवार यांचे मार्गदर्शनाखाली नेमलेले पथकाने दि.२० रोजी शहरातील व्यवसायीकांकडून घरगूती गॅसचा अवैध वापर करित असल्याचे निदर्शनास येताच १० घरगूती गॅस सिलेंडर जप्त करण्याची कारवाई करण्यात आल्याने व्यवसायीकांमध्ये खळबळ उडाली.

घरगुती गॅसचा वापर व्यावसायिक प्रयोजनासाठी करण्यात येऊ नये असे आवाहन तहसीलदार गुंडमवार यांनी कांही दिवसांपूर्वी केले होते, परंतु घरगुती गॅसचा अवैध वापर होत असल्याने त्याचा परिणाम घरगुती गॅस पुरवठा वर होत आहे. त्यामुळे तहसीलदार गुंडमवार यांचे मार्गदर्शनाखाली गठित केलेल्या पथकाद्वारे दि.२० रोजी भोकर शहरातील विविध हॉटेल भोजनालये टी स्टॉल अशा व्यावसायिक आस्थापनांवर अचानक धाडी टाकण्यात आले, तेव्हा एकूण १० ठिकाणी घरगुती गॅसचा अवैध वापर होत असल्याचे लिक्विफाइड पेट्रोलियम गॅस आदेश २००० मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे पथकाला निदर्शनास आल्याने या ठिकाणी गॅस सिलिंडर जप्त करण्याची कारवाई करण्यात आलेली असून प्रकरणात पुढील कार्यवाही सुरू आहे.

ही कारवाई तहसीलदार विनोद गुंडमवार यांच्या नेतृत्वाखाली श्रिकांत आडेपवार, पुरवठा अधिकारी, खंदारे, मंडळ अधिकारी,अनिल मुनेश्वर तलाठी,गड्डापुरे लिपिक,राऊत, गोदामपाल यांच्या पथकाने केली आहे. भोकर तालुक्यात घरगुती गॅस सिलेंडर चे व्यावसायिक वापर होत असल्याचे कुठेही निदर्शनास आल्यास तत्काळ प्रशासनास संपर्क साधावा असे आवाहन तहसीलदार गुंडमवार यांनी केले आहे.

# रामनवमीच्या निमित्ताने श्रीराम पहाट कार्यक्रमाचे आयोजन, राज्यातील गाजलेल्या कलावंतांची उपस्थिती

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ मार्च-**

श्रीराम नवमीचे औचित्य साधत २६ मार्च रोजी नांदेड येथे श्रीराम पहाट या सुरमयी संगीत सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. यावेळी महाराष्ट्रातील प्रतिभावंत गायकांच्या सुरेल सुरावटीतून सादर होणारी सुमधुर रामगीते रसिक श्रोत्यांसाठी श्रवणीय पर्वणी ठरणार आहेत. या विलोभनीय उपक्रमाचे हे सलग चौथे वर्ष असून कलागंण प्रतिष्ठान, श्रीराम भक्त मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हा अविस्मरणीय सोहळा साकार होत आहे.

येथील डॉ.शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात २६ रोजी गुरुवारी पहाटे साडे पाच वाजता आयोजित श्रीराम पहाट या भक्तिमय संगीतपर्वाचा शुभारंभ जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या हस्ते होणार असून मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे, प्रसिद्ध पोटविकार तज्ज्ञ डॉ. नितीन जोशी, डॉ.सुशील राठी, वेदशास्त्र संपन्न मनोजगुरू पेठवडजकर, उद्योजक रमेश पारसेवार, भगिरथ राठी यांची याप्रसंगी विशेष उपस्थिती असणार आहे.

श्रीराम नवमीच्या पावन पर्वावर सादर होणाऱ्या या संगीत सोहळ्यात प्रशांत काळुन्द्रेकर (मुंबई), प्रज्ञा देशपांडे (पुणे), संज्योती जगदाळे (मुंबई) आदी सुप्रसिद्ध गायक आपल्या सुमधुर स्वरात रामगीते सादर



करणार आहेत. त्यांना मंदार गोडसे, विवेक परांजपे, यश सोमण, पंढरीनाथ दरेकर, पंकज शिरभाते, भगवान देशमुख विविध वाद्यावर साथसंगत करणार आहेत.

एकापेक्षा एक सरस रामगीतांची अविट गोडी जपतांना त्याच्या जोडीला ॲड.गजानन पिंपरखेडे यांचे दर्जेदार निरूपणही यावेळी होणार असून या उपक्रमाची निर्मिती व संकल्पना देखील त्यांचीच आहे. या अप्रतिम निर्मितीला ज्येष्ठ पत्रकार विजय जोशी यांचे उल्लेखनीय सहाय्य लाभले आहे.

रामसेवा गौरव पुरस्कार

प्रभू श्रीराम यांचा १७ कोटी नामजप पूर्ण करणारे ॲड.व्यंकटेश पाटणूरकर व पवित्र अमरनाथ धाम येथील आतापर्यंत २७ यात्रा सफल करणारे ॲड.दिलीप ठाकूर यांना श्रीराम पहाट सोहळ्याच्या भव्य मंचावर रामसेवा गौरव पुरस्कार देवून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. या सोहळ्याला श्री.स्वामी समर्थ मंदिर व अन्नछत्र सोमेश कॉलनी, नांदेड यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.

श्रीराम नवमीच्या निमित्ताने व गोविंदगिरी देव महाराज व किशोरजी व्यास यांच्या कृपाशीर्वादाने सलग चौथ्या वर्षी आयोजित श्रीराम पहाट या अविस्मरणीय सोहळ्यात नांदेडकरांनी मोठ्या संख्येने सहभागी होवून रामगीतांचा भक्तिमय गजर करावा, असे आवाहन शिवप्रसाद राठी, रमेश मेगदे, गोवर्धन बियाणी, शंतनू डोईफोडे, डॉ.सुरेश दागडिया, महेश चांडक, निलेश चांडक, ॲड.चिरंजीलाल दागडिया, रमेश सारडा, नंदकुमार दुधेवार, राम शेट्टीतुप्तेवार, रमाकांत गंदेवार, बापू दासरी, माधवराव पटणे, अनिल शेटकार, रमेश मिरजकर, प्रणव मनुरवार, लक्ष्मीकांत बंडेवार, प्रा.प्रभाकर उदगीरे, श्याम राठी, विजय बंडेवार, जगजीवन सिंग रिसालदार, बालासाब मादसवाड, विजय डुमणे, पुरुषोत्तम देशपांडे, राजू कोटलवार, संतोष पाळेकर, कृष्णा केशटवार, नारायण आकमार, प्रसाद जोशी, रमेश सुरकुटवार यांनी केले आहे.



## रामनामाने जीवनातील अज्ञानाचा अंधकार दूर होतो : प.पू. राधाकृष्णजी

**तामसा** -कलियुगात ईश्वरापर्यंत पोहोचण्याचा आणि मनातील अशांती दूर करण्याचा 'रामनाम' हा सर्वात सोपा आणि प्रभावी मार्ग आहे. ज्याप्रमाणे सूर्याच्या उदयाने सृष्टीतील अंधकार नष्ट होतो, त्याचप्रमाणे हृदयात रामनामाचा जप सुरू झाला की, अज्ञानाचा आणि दुःखाचा अंधकार कायमचा मिटतो, असे प्रतिपादन परमपूज्य गोवत्स श्री. राधाकृष्णजी महाराज यांनी केले. श्री. शिव सद्गुरू शिवलिंग स्वामी दत्त संस्थान मठ तीर्थक्षेत्र पिंपळगाव येथे आयोजित राम कथा सोहळ्यात भाविकांना मार्गदर्शन करताना महाराज बोलत होते.

हदगाव तालुक्यातील श्री क्षेत्र पिंपळगाव येथील श्री. शिव सद्गुरू शिवलिंग स्वामी दत्त संस्थान मठाचे मठाधिपती परमपूज्य सिद्धधर्म शिरोमणी गोवत्स श्री. बालयोगी व्यंकट स्वामी महाराज यांच्या संकल्पनेतून दिनांक २० मार्च ते २७ मार्च दरम्यान राम कथेचे आयोजन केले आहे. कथा व्यास जोधपूर येथील परमपूज्य गोवत्स श्री. राधाकृष्णजी महाराज यांच्या रसाळ वाणीतून राम कथेला शुक्रवारी प्रारंभ झाला. सकाळी गाव ते थेट रामकथा मंडपापर्यंत महाराजांची बैलगाडीतून भव्य शोभायात्रा काढण्यात आली होती. कथेच्या पहिल्याच दिवशीची कथा सांगतांना परमपूज्य श्री राधाकृष्णजी महाराज पुढे म्हणाले, आजचा माणूस भौतिक सुखांच्या मागे धावत असताना मानसिक शांती गमावून बसला आहे. या व्याधीवर 'रामनाम' हेच एकमेव परम औषध आहे. जसा दिवा लावल्यावर खोलीतील अंधार क्षणात नाहीसा होतो, तसाच रामनामाचा प्रकाश माणसाच्या अंतःकरणातील काम, क्रोध, लोभ आणि मोह यांसारख्या विकारांना दूर सारतो. जीवन सुंदर बनविण्यासाठी मानवाला सत्संग महत्त्वाचा असतो. राम नाम हे मनोरंजनासाठी नसून तरुणांनी राम नामाचे सूत्र आचरणात आणावे असे ते म्हणाले. भक्ती करण्यासाठी कठीण तपाची गरज नाही; केवळ शुद्ध अंतःकरणाने घेतलेले भगवंताचे नावही मोक्ष प्राप्तीसाठी पुरेसे आहे. ज्याच्या ओठावर सतत रामनाम असते, त्याला जगातील कोणतीही संकटे डगमगून सोडू शकत नाहीत. रामनाम हे केवळ अक्षर नसून ती एक शक्ती आहे. असे अमृतवाचन श्री. राधाकृष्णजी महाराज यांनी व्यक्त केले. महाराजांच्या अमृतवाणीने संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला होता. कथेच्या शेवटी सामूहिक राम नामाचा गजरात हजारो भाविकांनी तल्लीन होऊन मनमुराद थीरकण्याचा आनंद लुटला. राम कथेमुळे भाविकांमध्ये एक नवी ऊर्जा आणि सकारात्मकता संचारल्याचे पाहायला मिळाले. राम कथेसाठी पंचक्रोशीतील हजारो भाविकांची मांदियाळी झाली होती. विशेषतः महिलांची संख्या विलक्षण संख्या होती. राम कथेसाठी हदगाव हिमायतनगर तालुक्याचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी उपस्थिती लावली होती. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तामसा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली तामसा, भोकर, हिमायतनगर, मनाठा, धर्माबाद, नांदेड येथून मोठी पोलिस कुमक तैनात करण्यात आली होती. राम कथेनंतर महाप्रसादाचा सोहळा संपन्न झाला.

## वंचित आघाडी कार्यकर्त्यांनी २३ मार्चला होणाऱ्या मोर्चात सहभागी व्हावे

**बिलोली** -पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राजीनामा द्यावा आणि देशाला पारतंत्र्यापासून रोखावे यासाठी २३ मार्च रोजी नागपूर आरएसएस मुख्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. या साठी नांदेड जिल्ह्यातुन हजारो कार्यकर्त्यासह आजी माजी पदआधिकारी नगरसेव उपस्थती रहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष शंकर महाजन यानी केली आहे.

वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या आंदोलनात मोठ्या संख्येने सामील होण्यासाठी नांदेड वंचित बहुजन आघाडीच्या वतीने नांदेड येथे बैठक घेण्यात आले. या वेळी प्रदेश उपाध्याक्ष फारुक अहमद, प्रदेश सदस्य,अविनाश भोसीकर,मराठवाड सदस्य डॉ.संघरत्न कुऱ्हे, जिल्हाध्यक्ष नांदेड ( दक्षिण) शंकर महाजन जिल्हाध्यक्ष (उत्तर) राज आटकोरे, जिल्हा महासचिव (दक्षिण) रवि जिल्हा महासचिव( उत्तर) दीपक मगर, विठ्ठल गायकवाड महानगराध्यक्ष संजय टिके जिल्हा संघटक डॉक्टर राम वनंजे, विनायक गजभारे जिल्हा उपाध्यक्ष, रंगनाथ गजले जिल्हा सचिव, अरुण भद्रे जिल्हा उपाध्यक्ष, जयकुमार ढवळे जिल्हा सल्लागार, विद्यानंद पवळे जिल्हा उपाध्यक्ष, गौतम डुमणे, प्रकाश कोल्हे, गणपत सवयी सोनकांबळे जिल्हा उपाध्यक्ष, के. एच. वने जिल्हा उपाध्यक्ष, दीपक कसबे प्रसिद्धीप्रमुख, बालाजी सूर्यतळ जिल्हाउपाध्यक्ष, धाराजी इंगोले जिल्हा उपाध्यक्ष, उत्तम वाढवे सह संघटक, प्रल्हाद इंगोले जिल्हा सल्लागार, यासह खूप मोठ्या संख्येने नांदेड उत्तर व दक्षिणचे जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते.

## आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालयाला 'दिशा अभियान' उत्कृष्टतेचे प्रमाणपत्र

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ मार्च-**

येथील आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालयाने 'दिशा अभियान' अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल विद्यालयाचा नुकताच विशेष सन्मान करण्यात आला आहे. विशेष म्हणजे विद्यालयाने सलग दुसऱ्यांदा हे प्रमाणपत्र पटकावले असून, या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी अवधूत गंजेवार, सहायक सल्लागार दिनकर नाठे आणि दिशा अभियानाचे समन्वयक संघरत्न धुतराज सर यांच्या शुभहस्ते हे उत्कृष्टतेचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. विद्यालयाच्या वतीने शाळेचे मुख्याध्यापक श्री मधुकर मनूरकर आणि उपमुख्याध्यापक श्री गणेश धुळे यांनी हे प्रमाणपत्र स्वीकारले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी या घवघवीत यशाबद्दल शाळेचे आणि व्यवस्थापनाचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

'दिशा अभियान' अंतर्गत दिला जाणारा अभ्यासक्रम अत्यंत प्रभावीपणे आणि उत्कृष्टरीत्या राबवल्यामुळेच शाळेला हा बहुमान मिळाला आहे. सलग दुसऱ्यांदा हे मानाचे प्रमाणपत्र मिळाल्यामुळे शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण असून, सर्वांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.

या यशाची दखल घेत राजस्थानी एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी शाळेच्या संपूर्ण चमूचे कौतुक केले आहे. राजस्थानी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ओमप्रकाश गिल्डा, उपाध्यक्ष कमल कोठारी, सचिव प्रकाश मालपाणी, सहसचिव डॉ. लक्ष्मीकांत बजाज, कोषाध्यक्ष जयप्रकाश काबरा, सदस्य बनारसीदासजी अग्रवाल, अंकित अग्रवाल यांनी मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, सर्व शिक्षक व कर्मचारी यांचे या यशाबद्दल विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.

## माजी सभापती प्रविण पाटील चिखलीकर व नगराध्यक्ष शरद पाटील पवार यांनी मुस्लिम बांधवांना दिल्या ईदच्या शुभेच्छा

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २१ मार्च-**

लोहा शहरात रमजान ईद निमित्ताने दरवर्षी प्रमाणे यंदाही इदगाह व शहरातील मध्यवर्ती भागातील जामा मस्जिद येथे नमाज अदा करण्यात आली. त्यानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना आलिंगन देत ईद की दुवा मागीतली तर हिंदु बांधवांनी सुद्धा आलिंगन देत शुभेच्छा दिल्या इदगाह येथे प्रवीण पाटील चिखलीकर यांनी सर्व बांधवांचे स्वागत केले व शुभेच्छा दिल्या सामाजिक एकोपा व बंधुभाव याची शिकवण देणारा हा सण आहे आपण सर्वजण गुण्यागोविंदाने नांदत एकमेकांच्या उत्साहात सहभागी होत असतो असा भावना त्यांनी व्यक्त केल्या

नगराध्यक्ष शरद पाटील पवार यांनी रमजान ईद निमित्ताने मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या

लोहा शहरात रमजान ईद म्हणजे ईद उल फितर मोठ्या उत्साहात आनंदात साजरी करण्यात आली .तीस दिवसाचे रोजे संपल्या नंतर मुस्लिम बांधवांनी आज



मोठया आनंदात एकमेकांना आलिंगन देत हा सण साजरा केला सुख समृद्धी व आनंदी जीवनाची अल्लाहाकडे प्रार्थना केली

दरवर्षी प्रमाणे यंदाही जुन्या शहरातील तांड्याकडे जाणाऱ्या मार्गावरील इदगाह येथे रमजान ईद निमित्ताने सकाळी नमाज अदा करण्यात आली .त्यानंतर सर्व बांधवानी एकमेकांना आलिंगन दिले .युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर ,नगराध्यक्ष शरद पाटील पवार, युवा नेते सचिन पाटील चिखलिकार

माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार , माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम उपनगराध्यक्ष करीम शेख , माजी उपनगराध्यक्ष दता वाले नगरसेवक हरिभाऊ चव्हाण पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने, पीएसआय श्री पाटील डीएसबीचे सदाशिव जामकर ,यासह अनेक मान्यवरांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या

उपनगराध्यक्ष करीम शेख, मस्जिद सदर निहाल मन्सूरी, खादरसाब ड्रायव्हर, सलीम शेख , पटेल ,चांद शेख, सिंकदर शेख, नबीसाब पठाण, यासह मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव सहभागी झाले होते.

# सिडकोत ठिकठिकाणी रमजान ईद निमित्त मुस्लिम बांधवांचे पुष्प देऊन स्वागत

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २१ मार्च-**

सिडको परिसरातील मुजामपेठ ईदगाह मैदान येथे रमजान ईद उल फितर निमित्ताने काजी मुतवल्ली यांनी नमाज पठाण करून समाज बांधवासह देशातील सर्व जनतेच्या सुख समाधानासाठी प्रार्थना केली. त्यानंतर लगेच परतीच्या मार्गी जाणाऱ्या मुस्लिम बांधवांचे गुलाब पुष्प देऊन वंचित बहुजन युवा आघाडीचे सम्राट आढाव यांनी स्वागत केले तर खुबा मज्जिद या ठिकाणी सामाजिक कार्यकर्ते अवतार सिंग सोडी महाराज व डॉ. नरेश रायवार यांनी मुस्लिम बांधवांना गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

सिडकोतील ठिकठिकाणीच्या मज्जित व



ईदगाह मैदानावर रमजान ईद दिनांक २१ मार्च २०२६ रोजी सिडको परिसरात मोठ्या उत्साहात साजरी झाली. याप्रसंगी सकाळी आठ वाजताच्या नमाज पठन झाल्यानंतर मुजामपेठ ईदगाह मैदानावर वंचित बहुजन युवा आघाडीचे सम्राट आढाव व त्यांचे सहकारी यांनी मुस्लिम बांधवांना गुलाब

पुष्प देऊन स्वागत करत सामाजिक बांधिलकी जोपासली. त्याचवेळी खुबा मजीद सिडको या ठिकाणी मुस्लिम बांधवांच्या नमाज पठन झाल्यानंतर सामाजिक कार्यकर्ते अवतारसिंग सोडी व डॉ. नरेश रायवार यांनी ही गुलाब पुष्प देऊन सामाजिक बांधिलकी जोपासली. यावेळी सचिन बारटक्के,राजू टमाना, एकनाथ रायपतवार,लतिफ म.शेख,गोपाल खडकीकर सुरेश कुलकर्णी, निखिलेश देशमुख, संतोष शहाणे यांची उपस्थिती होती. तर या उपस्थितांना अशपाक भाई यांनी आपल्या निवासस्थानी नेऊन क्षिरकुर्मा ची मेजवानी दिली. तर याचवेळी सकाळी मुजामपेट ईदगा मैदानावर नमाज नंतर वंचित बहुजन युवा आघाडीचे सम्राट आढाव विकास धोतरे, आकाश गजभारे, सचिन पवळे, मनोज नांदेडकर, आकाश सूर्यवंशी, प्रदीप हनवते, सिदोधन कापसीकर पत्रकार संभाजी सोनकांबळे यांची उपस्थिती होती. यावेळी मुस्लिम बांधवांनी सकाळी आठ वाजताची नमाज पठण करून समाज बांधवासह देशातील सर्व जनतेस सुख-सुमाधान मिळण्यासाठी प्रार्थना केली. यावेळी ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार संजय केंद्रे, संभाजी मुंडे, हरीश मांजरमकर, गृहरक्षक दलाचे आ.मुखीद आ. रऊफ यांच्यासह मुजामपेटचे पोलीस पाटील तुकाराम एलगंदलवाड तर धनेगावचे पोलीस पाटील संजय यांन्नावार यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## साई भक्त पंधरा वर्षापासुनची परंपरा ; पदयात्रा शिर्डीकडे रवाना

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. २० मार्च-**

श्रीसंत कवी दासगणू महाराज साईभक्त मंडळ उमरी - गोरठा ते श्रीक्षेत शिर्डी पदयात्रा साई मंदिर उमरी येथून रवाना झाली आहे . प्रतिवर्षी प्रमाणे या वर्षी रामनवमी उत्सव निमित्त श्रीसंत कवी दासगणू महाराज साई भक्त मंडळ उमरी (गोरठे )ते श्रीक्षेत्र शिर्डी पदयात्रा वर्ष १५ वे उमरी येथील श्री साईबाबा मंदिर येथे प्रकाश महाराज, गोपाळ राठोड,अशोक मामीडवार यांच्या हस्ते आरती करून श्रीसंत कवी दासगणू महाराज साई भक्त मंडळ चे विष्णू भाऊ अट्टल ,अशोक मामीडवार,पंडित बेंबरे,गोपाळ राठोड,महेश नगनूरवार,सुभाष पेरेवार,गजानन श्रीरामवार,ध्वज धारक,पताका धारक रामलू श्याकुलवार,संतोष हैबतकर,संजय चुनकवाड,मारोती गोडगे यांचा सत्कार साई मंदिर समिती उमरी समिती मार्फत साईनाथ पेरेवार,दत्तात्रय वारेवार,सदानंद खांडरे,बाबू पांचाळ,सुनील निरावार,शंकर पाटील,भगवान खांडरे,सोनू नूनूंचे,लक्ष्मण इरलवाड,सोमनाथ हेमके,मुकेश कोलशवार,गजानन शिलेवार,समरत पाटील ,दामोधर लापशेठवार,शंकर मुक्कावार गुरुजी यांच्या हस्ते करण्यात आले. साईरथ चे सारथ्य नागेश हैबते,साईरथ चे महाराज बाळू महाराज ,

या वेळी नगराध्यक्ष प्रतिनिधी भगवान मुदीराज,नगरसेवक बाळू शिंदे,साई जमदाडे ,संदीप लापसेठवार सर्व साई भक्त गावातील प्रतिष्ठित नागरिक व महिला साई भक्त हजर होते. मोठ्या हर्ष उल्हासात उमरी ते श्रीक्षेत्र शिर्डी पदयात्रास प्रारंभ करण्यात आले. गणेश नगरात बेंबरे , दिलिप पाटील चंदनवार,सावंत सर, डॉ माधव विभूते , नगरसेवक संदीप चंदनवार ,साई पालखीचे पूजन करुन साईभक्तांचे स्वागत करुन आईस्क्रीम, मठ्ठा थंड जल पानाची व्यवस्था केली.

## महापूरुषांच्या जयंतीनिमित्त न.प.कडून निधी मंजूर करा : नगरसेवक वाघमारे

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. २१ मार्च-**

शहरात दरवर्षी महापूरुषांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते.त्यात प्रामूख्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर,छ. शिवाजी महाराज,लोकशाहीर आण्णाभाऊसाठे व इतर महापूरुषांची जयंती होत असते त्यासाठी नगरपरिषदेकडून प्रत्येक महापूरुषांच्या जयंतीसाठी सांस्कृतीक कार्यक्रम निधी म्हणून एक लाख पन्नास हजार रुपये एवढ्या निधीची तरतूद करण्याची मागणी नगरसेवक अविनाश वाघमारे यांनी नगराध्यक्ष भगवानराव दंडवे यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात नमूद केले की, भोकर शहरात पुढिल एप्रिल २०२६ या महिण्यामध्ये महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी होत असून जयंती निमित्त विविध सांस्कृतीक कार्यक्रम रॅलीचे आयोजन प्रबोधन सभेचे आयोजन करण्यात येणार आहे.सदरील कार्यक्रमासाठी नगरपरिषदेकडून निधी मंजूर केल्यास मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यासाठी मदत होईल याकरिता सांस्कृतीक कार्यक्रम निधी म्हणून एक लाख पन्नास हजार रुपयाचा निधी मंजूर करण्यात यावा व तसा ठराव सर्वसाधारण सभेत पारित करण्यात यावा अशी मागणी न.प.चे नगरसेवक अविनाश वाघमारे यांनी केली आहे. निवेदनाच्या प्रती मूख्याधिकारी यांचेकडे पाठविण्यात आले.

# मुख्याध्यापकांच्या 'संगनमताने' गुंटुर येथील जि.प. शाळेत कापला वाढदिवसाचा केक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ मार्च-**

कंधार तालुक्यातील गुंटूर येथील जिल्हा परिषद शाळेत शालेय वेळेत नियमबाह्य पद्धतीने वाढदिवस साजरा केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अध्यापनाचे काम सोडून शाळेत खासगी कार्यक्रम उरकणाऱ्या संबंधित मुख्याध्यापक आणि सहशिक्षक धनंजय पाटील यांना तात्काळ निलंबित करावे, अशी मागणी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे नांदेड जिल्हा शहर उपाध्यक्ष शुद्धोधन ढवळे यांनी केली आहे.

दि १२ मार्च २०२६ रोजी गुंटूर येथील जिल्हा परिषद शाळेत कार्यरत असलेले सहशिक्षक धनंजय पाटील यांनी मुख्याध्यापकांशी संगनमत करून प्रशासनाची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता शाळेत आपला वाढदिवस साजरा केला. अध्यापनाच्या वेळेत शासकीय नियमांचे उल्लंघन करत वर्गामध्ये शासकीय वस्तूंचा वापर करून आणि बाहेरील मंडळींना बोलावून हा कार्यक्रम पार पडला. यावेळी केक कापून आणि गाणी वाजवून विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा जल्लोष करण्यात आला.

**विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ**

या शाळेत बहुतांश शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी वर्गाची मुले शिक्षण घेतात. शाळेची वेळ ही केवळ विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी आणि प्रगतीसाठी असणे अपेक्षित असताना अशा प्रकारे वैयक्तिक कार्यक्रम साजरे करणे हा नियमाने गुन्हा आहे. शिक्षकांनी आणि मुख्याध्यापकांनी संगनमताने नियमांना धाब्यावर बसवून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीला कारणीभूत ठरल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, नांदेड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांना रितसर निवेदन देण्यात आले आहे. शाळेत खासगी कार्यक्रम साजरे करून शासनाची दिशाभूल केली जात आहे. अशा कृत्यामुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ मांडणाऱ्या शिक्षकांवर कठोर कारवाई करून त्यांना तात्काळ सेवेतून निलंबित करावे, अशी आग्रही मागणी शुद्धोधन ढवळे यांनी केली आहे.

आता या प्रकरणावर शिक्षण विभाग नेमकी काय भूमिका घेते आणि दोषींवर काय कारवाई होते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्सने भारतात GLIPIQ (सेमाग्लूटाइड) लाँच केले

**मुंबई :** ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लिमिटेड (ग्लेनमार्क), एक संशोधन-आधारित जागतिक औषध निर्माण करणाऱ्या कंपनीने,जीएलपी-१ थेरपीसाठी परवडण्याजोग्या किमतीत एक नवा मापदंड स्थापित करीत, आणि रुग्णांना प्रगत मधुमेह उपचारांपर्यंत अधिक व्यापक प्रवेश मिळावा यासाठी. आज भारतात टाइप २ डायबिटीज मेलिटस (टी२डीएम) च्या व्यवस्थापनासाठी GLIPIQ (सेमाग्लूटाइड) लाँच केल्याची घोषणा केली. अनेक रुग्णांच्या बाबतीत, खर्च आणि गुंतागुंत यामुळे प्रगत इंजेक्शनद्वारे दिल्या जाणाऱ्या थेरपीची सुरुवात करण्याचा निर्णय अनेकदा उशिरा घेतला जातो. GLIPIQचे उद्दिष्ट परवडणाऱ्या किमतीत लक्षणीय सुधारणा करून, जीएलपी-१ थेरपीपर्यंत प्रवेश वाढवणे आणि अधिक व्यापक रुग्ण समूहास उपचाराची सुरुवात लवकर करण्यास सक्षम करणे हे आहे.

### एमजीएममध्ये कै.डॉ.गंगाधर पाथ्रीकर स्मृतीदिनानिमित्त विशेष व्याख्यान

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशनचे माजी सचिव कै.डॉ.गंगाधर पाथ्रीकर यांच्या चोविसाव्या स्मृतीदिनानिमित्त महात्मा गांधी मिशन विद्यापीठात विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, दिनांक २२ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता आईन्स्टाईन सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे. या विशेष व्याख्यानात कृषिभूषण त्र्यंबकराव पाथ्रीकर हे 'आठवणीतील भाऊ' या विषयावर आपले विचार मांडणार आहेत. त्यांच्या अनुभवातून कै.डॉ.पाथ्रीकर यांच्या कार्याचा आणि व्यक्तिमत्त्वाचा वेध घेण्यात येणार आहे. या कार्यक्रमास एमजीएमचे सचिव अंकुशराव कदम, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, तसेच डॉ.जी.वाय.पाथ्रीकर संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.प्राप्ती देशमुख यांच्यासह सर्व संबंधित मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सदर कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### श्री.पावन मारुती समितीतर्फे आज भव्य हिंदू संमेलन व शोभायात्रेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दीच्या निमित्ताने टिळक नगर परिसरातील श्री पावन मारुती हनुमान मंदिर समितीने रविवार दिनांक २२ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळामध्ये विनायक आदर्श हाऊसिंग सोसायटीच्या पावन मारुती मंदिरात भव्य हिंदू संमेलनाचे आयोजन केले असून या संमेलनात प्रमुख अतिथी म्हणून विश्र्व हिंदू परिषदेचे देवगिरी प्रांत धर्माचार्य संपर्कप्रमुख हरिभक्त परायण जनार्दन महाराज मेटे, महानुभाव आश्रमाचे पूज्य मुनिश्री सुदर्शन महाराज कपाटे हे उपस्थित राहणार असून प्रमुख वक्ते म्हणून सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री माननीय श्री संजय जी पाचपोर हे मार्गदर्शन करणार आहेत.

या भव्य हिंदू संमेलनापूर्वी दुपारी ३.३० वाजता शोभायात्रा निघणार असून सदर शोभायात्रा उल्कानगरीतील श्री.राम मंदिरापासून निघून चेतक घोडा सायली हॉटेल महादेव मंदिर तानाजी चौक शिवशंकर कॉलनी रवींद्र नगर नाजुका कॉर्नर रोपळेकर चौक विवेकानंद चौक हजारी कॉर्नर मार्गे श्री पावन मारुती मंदिरात पोहोचेल. या शोभायात्रेत भारतमाता प्रभू श्रीराम छत्रपती शिवाजी महाराज या वेशभूषेत नटलेल्या महिला पुरुषांसह तसेच घोडे रथ आणि बँड राहणार आहे.

या भव्य हिंदू संमेलनात मोठ्या संख्येत उपस्थित राहावे असे आवाहन श्री पावन मारुती समितीचे अध्यक्ष श्री प्रल्हाद पन्हाळे सचिव ड. बाळासाहेब वाघमारे आणि समितीच्या सर्व सदस्यांनी केले आहे..

### एमजीएममध्ये मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या नेत्र विभागातर्फे नागरिकांसाठी मोठा दिलासा देणारा उपक्रम हाती घेण्यात आला असून सोमवार दिनांक २३ मार्च २०२६ ते १० एप्रिल २०२६ या कालावधीत मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत डोळ्यांच्या आजारांचे प्रमाण वाढत असून, विशेषतः मोतीबिंदू हा आजार वृद्धांमध्ये मोठ्या प्रमाणावर आढळतो. आर्थिक अडचणींमुळे अनेक रुग्ण शस्त्रक्रिया टाळतात. याच पार्श्र्वभूमीवर एमजीएमच्या नेत्र विभागाने सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या शिबिरामध्ये SICS (Small Incision Cataract Surgery) शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात येणार असून, आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित फेको (Phaco) शस्त्रक्रिया देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे. फेको शस्त्रक्रियेसाठी रुग्णांकडून केवळ लेन्सचे नाममात्र शुल्क आकारले जाणार आहे. शिबिरादरम्यान तज्ज्ञ नेत्ररोगतज्ज्ञांकडून रुग्णांची सखोल तपासणी, आवश्यक मार्गदर्शन तसेच सुरक्षित आणि दर्जेदार शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. रुग्णांच्या सोयीसाठी सर्व आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे.या उपक्रमाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन एमजीएम रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ.राजेंद्र बोहरा आणि नेत्र विभागाच्या प्रमुख डॉ.सारिका गाडेकर यांनी केले आहे.

### सोयगाव शहरासह ग्रामीण भागात गुढी पाडवा सण मोठ्या उत्साहात साजरा

**सोयगाव :** सोयगाव सह तालुक्यातील ग्रामीण परिसरात मराठी नववर्ष गुढी पाडवा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.गुरुवार दि.१९ मार्च रोजी गुढी पाडवा सण असल्याने ग्रामीण भागात प्रत्येकानी आप आपल्या घरोघरी गुढी उभा करून मराठी नववर्ष साजरे केले.

साडेतीन मुहूर्तांपैकी गुढी पाडवा हा एक मुहूर्त असल्याने या सणाचे महत्त्व हिंदू संस्कृतीत फार मोठे आहे.म्हनुनच प्रत्येक वर्षी ग्रामीण भागात गुढी पाडवा हा सण मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरा केला जातो.

# रमजान ईद उत्साहात साजरी; एकात्मतेचा सुंदर संदेश

## ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज, सर्व धर्मीयांकडून गळाभेटी देत शुभेच्छांचा वर्षाव

**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. २१ मार्च :** सोयगाव शहरातात रमजान ईद सण अत्यंत उत्साहपूर्ण आणि आनंददायी वाता-वरणात साजरा करण्यात आली. रमजान ईदच्या निमित्ताने सोयगाव - शेंदुर्णी रोड येथील ईदगाह मैदानावर सामूहिक नमाजाचे पठण करण्यात आले.सकाळी लवकरच मुस्लिम बांधवांनी नवीव कपडे व आकर्षक कपडे परिधान करून नमाज अदा करण्यासाठी मोठ्या संख्येने ईदगाह मैदानावर सहभागी झाले होते.



ईदच्या या पवित्र प्रसंगी शहरात बंधुभाव आणि एकात्मतेचे दर्शन घडले. विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी तसेच सर्व धर्मीय नागरिकांनी मुस्लिम बांधवांना गळाभेट देत ईदच्या शुभेच्छा दिल्या.यामुळे सामाजिक ऐक्याचा सुंदर संदेश संपूर्ण शहरात पसरला.

सणाच्या पार्श्र्वभूमीवर नगरपंचायतीकडून गुलाबाचे फुल देऊन व शरबत देऊन ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी नगरपंचायतने मुस्लीम बांधवान साठी ईदगाह या ठिकाणी मंडपची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच पोलीस प्रशासनाकडून ईदगाह मैदानावर मोठ्या प्रमाणात कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

यावेळी शिवसेना उपजिल्हा प्रमुख तथा उपनगराध्यक्ष प्रभाकर (आबा) काळे,गटनेते अक्षय काळे, नगरसेवक तथा सोयगाव शहर प्रमुख संतोष बोडखे, नगरसेवक हर्षल काळे, नगरसेवक भगवान जोहरे, नगरसेवक गजानन कुडके, नगरसेवक दिपक पगारे, नगरसेवक राजु दुतोंडे, नगरसेवक किशोर मापारी, नगरपंचायत कर्मचारी राजेश मानकर, समाधान गायकवाड,संदीप चौधरी, कृषी भूषण अरुण सोहनी,समाधान काळे, रमेश गव्हाडे,गजानन गव्हाड, सह सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पो-लीस निरीक्षक पंकज बारवाल, पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर, पोलीस गजानन दांडगे,अजय कोळी, सादीक तडवी होमगार्ड कृष्णा शेवाळकर, सचिन इंगळे,योगेश बोखारे, दिपक कादेलकर, विनोद इंगळे,विजय चौधरी,सह शहरा-तील समाजसेवक व राजकीय पक्षाचे नेते उपस्थित होते.

## सोयगाव येथे करिअर मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. २१ मार्च :** कुरुक्षेत्र करिअर अकॅडमी सोयगाव व जिल्हा परिषद प्रशाला,सोयगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दहावी-बारावीनंतर काय ? या करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचा उत्साहात समारोप झाला.विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आयोजित या उपक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.



या कार्यक्रमात भास्कर चौधरी,सचिन ढगे व सीमा राऊत यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.त्यांनी दह-ावी व बारावीनंतर उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक शाखा, स्पर्धा परीक्षा,व्यावसायिक अभ्यासक्रम तसेच करिअरच्या विविध संधींबाबत सविस्तर माहिती दिली.

मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांच्या मनातील संभ्रम दूर करून योग्य करिअर निवडीसाठी आत्मविश्र्वास निर्माण केला.योग्य नियोजन,सातत्यपूर्ण मेहनत आणि चिकाटी यांच्या जोरावर कोणतेही ध्येय साध्य करता येते, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी यावेळी दिला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये करिअरविषयी जागरूकता निर्माण झाली असून त्यांच्या भविष्यासाठी योग्य दिशा मिळण्यास मदत झाली आहे. कार्यक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक दादाराव राठोड तसेच सुकदेव पाटील,वैजनाथ सावळे, दौलतसिंग परदेशी,शिवाजी नवले,राजेंद्र उंबरकर,शिवराम आगे,विद्याधर बागुल,जयश्री वाघ व संगीता सोनवणे मॅडम यांचे अनमोल सहकार्य लाभले.

## जिल्ह्यात चौथा क्रमांक; अभिनव राठोडचा नवोदयमध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि. २१ मार्च :**

शैक्षणिक गुणवत्तेचा पुन्हा एकदा ठसा उमटवत कन्नड शहरातील फातिमा कॉन्व्हेंट इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी अभिनव करण राठोड याने पीएम श्री जव-ाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत उज्वल यश संपादन केले आहे. अभिनवने ९८.७५ टक्के गुण मिळवत जिल्ह्यात चौथा क्रमांक पटकावला असून तो नवोदय विद्यालयात प्रवेशासाठी पात्र ठरला आहे. अभिनवच्या या यशामागे कुटुंबीयांचा विशेषतः आजी-आजोबा व वडिलांचा भक्कम पाठिंबा लाभला आहे. सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य मार्गदर्शन आणि मेहनतीच्या जोरावर त्याने हे यश मिळवले. या यशाबद्दल शाळेच्या प्राचार्या सिस्टर लीडा, शिक्षिका अस्मिता जोशी, सचिन शेलार, उमेश टेकाळे, तसेच गुरु कोचिंग क्लासेसच्या संचालिका पूजा शिवराज पाटील, नगरसेवक बंटी सुरे व प्रदीप सनंसे यांनी अभिनवचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



## कलिकुंड पार्श्वनाथ सैतवाल दिगंबर जैन मंदिर येथे भ.महावीर जन्म कल्याणक बैठक संपन्न



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २१ मार्च :** श्री १००८ कलिकुंड पार्श्र्वनाथ सैतवाल दिगंबर जैन मंदिर येथे सकल जैन समाजाच्या तत्त्वादांमध्ये भ.महावीर जन्म कल्याणक २०२६. ची चौथी नियोजन बैठक सकल जैन समाजाचे अध्यक्ष राजेंद्र बाबुजी दर्डा याचा मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये जैन धर्माचा प्रचार व प्रसार महावीर जन्म कल्याणक महोत्सव निमित्ताने व्हावा, जगात शांतता पसरावी सोबतच सकल जैन समाजाचे एकत्रीकरण ची एक मोठी शृंखला पुन्हा प्रस्थापित करायचे अशा विषयांवरती आजच्या बैठक होती.

यामध्ये सर्वप्रथम सर्व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. यामध्ये महावीर पाटणी मिठालाल जी कांकरिया जीएम बोथरा विलासजी साहूजी, प्रतीक सावजी अजय सिंगवी, निलेश सावलकर बाहुबली वायकोस पंकज साकला श्रेणीक कासलीवाल हितेश कांकरिया, दिगंबर वायकोस दिगंबर क्षीरसागर मूकेश साहूजी जे बी पाटील राहुल जोगी स्वप्निल पारख. कविताजी अजमेरा सारिका साहूजी सविताताई गोसावी ज्योतीताई सुगंधी वंदना गवळी आदी च्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.

बैठकीचे अध्यक्ष पद प्रकाश भाकरे आणि वर्धमान वायकोस यांनी सुशोभित केले. त्यानंतर मंगलाचरण कु मानसी वायकोस यांनी सादर केले. प्रास्ताविक निलेश सावळकर यांनी केले त्यामध्ये यावर्षीची टॅगलाईन आपला शहर आपली जिम्मेदारी या विषयाला अपरिग्रह विषयातून जैन धर्माने सगळ्यांना सुचवावे असा आग्रह त्यांनी धरला. विलास साहुजींनी आपलं मनोगत व्यक्त करताना माझे शहर माझी जबाबदारी या भावनेने जन्म कल्याण साजरा करावा असे सागितलं

महावीर जी पाटणी यांनी नवनिर्वाचित डीडी वायकोस साहेब आणि सविताताई गोसावी यांचे मनःपूर्वक स्वागत केले व त्यांच्यामुळे सकल जैन समाजाचे शक्ती वृद्धंगीत होईल . वरील बैठकीच्या यशस्वी ते करिता रवींद्र सांगोले बाहुबली धोंगडे संदेश अन्नदाते दीपक वायकोस विजय म्हेत्रे राजकुमार लिंगायत अमोल पुर्णेकर मंजू सिंगलकर लता महाजन

शैलजा सांगोले वैशाली सांगोले पल्लवी वायकोस मीनाक्षी उदगीरकर संजीवनी बाळशेठे प्रतिभा सावळकर व विद्या म्हेत्रे दर्शनासंगवे मंगला शिरसागर लता अन्नदाते सारिका दलाल आहेरकर ताई सतोश पापडीवाल शिरीष साहूजी आदींची उपस्थित होती

यावेळेसची महावीर जन्म कल्याण महोत्सव हा महा महोत्सव बनवायचा पण त्यामध्ये फ्लेक्स होर्डिंग मुक्त शहर ठेवायचा निर्धार सर्वानुमते पारित करण्यात आला.

आपले शहर आपली जिम्मेदारी या टॅग लाईनला अनुसरून अपरिग्रह धर्माचे दर्शन घडवून आणले.

## सयराम बाबा पाडळे वस्ती सोनखेडा या ठिकाणी त्रिदिनिय सप्ताह उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**खुलताबाद, दि. २१ मार्च :** सोनखेडा (पाडळे वस्ती) तालुका खुलताबाद या ठिकाणी सयराम बाबा जागृत मंदिराजवळ मागील ४ वर्षा पासून ३ दिवसीय सप्ताह मोठ्या उत्साहात भाविक भक्तांच्या उपस्थितीत विविध धार्मिक कार्यक्रमाने उत्साहात संपन्न होत आहे



ज्ञानेश्वर पारायण सोहळा. सायंकाळी ७ ते ९ किर्तन सेवा आलेल्या भाविक भक्तांसाठी अन्नदान सेवा आयोजन करण्यात आले . ज्ञानेश्वर पारायण सो-हळा. १९ मार्च सायंकाळी ७ ते ९ किर्तन सेवा आयोजन करण्यात आले होते दि २१ मार्च रोजी काल्याचे किर्तन आणि सप्ताह सांगता करण्यात आली. ह भ प संतोष महाराज भोसले. भानुदास महाराज जिरीकर. रामेश्वर महाराज मगर या मान्यवरांच्या कीर्तन सेवा संपन्न झाली आलेल्या भाविकांना हिंदू सनातन धर्म टिकवण्यासाठी आपल्या गाव वस्तीवर देव देवतांच्या ठिकाणी गावोगावी सप्ताह उत्साह साजरा करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

या सप्ताह साठी श्री क्षेत्र वेरूळ नाथ आश्रम प्रमुख नाथ योगिनी अक्का महाराज. भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे .संतोष करपे यांनी सदिच्छा भेट दिली एका लहान वस्तीवर भव्य दिव्य अशा धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल आयोजक कमिटीचे मनापासून धन्यवाद व्यक्त केले या कार्यक्रमासाठी शिवाजी वाकळे मोहन वाकळे मनोज वाकळे यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी पुढाकार घेऊन रामेश्र्वर महाराज मगर यांच्या काल्याचे किर्तन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## मराठवाड्यातील पहिल्या 'सिंपल वन सुपर स्कुटर' शोरूमचे उद्घाटन संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २१ मार्च :** गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर मराठवाड्यातील पहिल्या सिंपल वन सुपर स्कुटरच्या 'सिंपल स्टोअर - ईव्ही इलाईट मोबॅलिटी' या नाव-ाने ओळखल्या जाणाऱ्या शोरूमचे उद्घाटन मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

यावेळी, मंत्री अतुल सावे, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, हेमंत शिंदे, पंकज ढोबळे, उद्योजक, वाहनप्रेमी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

सिंपल वन सुपर स्कुटर ही अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित, उच्च कार्यक्षमतेची आणि पर्यावरणपूरक अशी इलेक्ट्रिक स्कूटर असून ती ग्राहकांना स्मार्ट आणि किफायतशीर मोबिलिटीचा उत्कृष्ट पर्याय उपलब्ध करून देते. विश-ेषतः दीर्घ पल्ल्याची क्षमता, आकर्षक डिझाइन आणि प्रगत फीचर्स यामुळे या स्कूटरला बाजारपेठेत विशेष स्थान प्राप्त होत आहे. पर्यावरणपूरक आणि किफायतशीर वाहतुकीकडे देश वेगाने वाटचाल करत असताना, या उपक्रमामुळे छत्रपती संभाजीनगरमध्ये ई-मोबिलिटी क्षेत्राला नवी दिशा मिळणार आहे. नागरिकांना अत्याधुनिक इलेक्ट्रिक दुचाकी, सेवा सुविधा आणि विश्र्वासार्ह पर्याय एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत.

उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी इलेक्ट्रिक वाहनांच्या वाढत्या वापराचे महत्त्व अधोरेखित करत, पर्यावरण संरक्षणासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे नमूद केले. तसेच, मराठवाडा विभागात अत्याधुनिक ई-वाहन सुविधा उप-लब्ध करून देण्याच्या या उपक्रमाचे त्यांनी स्वागत केले.

या नव्या उपक्रमामुळे स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मितीला चालना मिळणार असून प्रदूषण कमी करण्यास आणि स्वच्छ ऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन मिळणार आहे.

# लासूर स्टेशनमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला नवे नेतृत्व; अमोल शिरसाठ शहराध्यक्षपदी

**तभा वृत्तसेवा**

**लासूर स्टेशन, दि. २१ मार्च :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या लासूर स्टेशन शहर अध्यक्षपदी अमोल शिरसाठ यांची निवड करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष तथा आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. या निवडीमुळे पक्ष संघटनेत नवचैतन्य निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

अमोल शिरसाठ हे दीर्घकाळापासून राजकीय क्षेत्रात सक्रिय कार्यकर्ते असून, युवक संघटना तसेच स्थानिक पा-तळीवरील विविध पदांवर काम करताना त्यांनी संघटन कौशल्य सिद्ध केले आहे. शहरातील सामाजिक उपक्रम, जनसंपर्क मोहिमा आणि नागरिकांच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठवला आहे. सध्या ते सावंगी ग्रुप ग्रामपंचायतीचे सदस्य असून त्यांच्या नेतृत्वामुळे शहरात पक्षाची पकड अधिक मजबूत होईल, असा विश्र्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

नियुक्तीनंतर बोलताना अमोल शिरसाठ यांनी जिल्हाध्यक्ष आमदार सतीश चव्हाण तसेच सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानले. माझ्यावर सोपवले-ली जबाबदारी मोठी आहे. शहरातील प्रत्येक घटकापर्यंत पक्षाची विचारधारा पोहोचवण्याचा माझा प्रयत्न असेल. सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन संघटना अधिक सक्षम आणि प्रभावी बनवणार, असे त्यांनी सांगितले.

येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेऊन पक्षाची ताकद वाढवणे, नव्या कार्यकर्त्यांना संधी देणे आणि जनतेच्या समस्या प्रभावीपणे मांडणे यावर भर दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, अमोल शिरसाठ यांच्या निवडीचे प्रदेश सरचिटणीस दिलीप नाना बनकर, तालुका अध्यक्ष तथा नगराध्यक्ष संजयभाऊ जाधव, उपजिल्हाध्यक्ष अनिल भैया जाधव, बापूसाहेब देशमुख, पंचायत समिती सदस्य शुभम भैया बोऱ्हाडे, जिल्हा सचिव महेश खेडकर, युवक तालुका अध्यक्ष प्रदीप चव्हाण, फारुख शेख, जयदेव जाधव, नारायण ठोळे, अजीज पठाण, नितीन कांजूने, मोहसीन बागवान, किशोर नरोडे, रा-हुल गुंजकर, लखन गुजर, प्रतीक



खंडेलवाल, अशोक खिल्लारे, साईराज चव्हाण, शरद पगारे, शाहरुख शेख, नदीम शेख, आकाश भगुरे यांच्यासह शहरातील विविध राजकीय, सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांनी स्वागत करून शुभेच्छा दिल्या आहेत.